



दैनिक

# सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर  संचालक-संपादक : अजय बिवडे



Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, १५ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३०६ | किंमत : २ रूपये



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# ज्ञानेश कुमार यांचा 'निकाल' आजच ?

## राहुल गांधींच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणीची शक्यता

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

मुख्य निवडणूक आयुक्त आणि मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाविरोधात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर आता गुरुवारी, १५ ऑक्टोबर रोजी सुप्रीम कोर्टात सुनावणी होण्याची दाट शक्यता आहे. सुप्रीम कोर्टाच्या अधिकृत संकेतस्थळावर राहुल गांधी आणि इतर १२ विरोधी



नेत्यांच्या याचिकेची संभाव्य सुनावणीची तारीख गुरुवारी (१५ ऑक्टोबर) दर्शवण्यात येत आहे.

यापूर्वी ही संभाव्य तारीख २६ ऑक्टोबर दाखवली जात होती. सर्वोच्च न्यायालयाच्या अपडेटेड लिस्टिंगनुसार, ही सुनावणी गुरुवारी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यापूर्वी न्यायालयाच्या संगणक प्रणालीत दसऱ्याच्या सुट्ट्या संपल्यानंतर म्हणजेच २६ ऑक्टोबर ही तारीख दाखवण्यात आली होती. मात्र, याचिकाकर्त्यांच्या कायदेशीर पथकाने प्रकरणाचे गांभीर्य आणि तातडी लक्षात घेऊन तातडीने सुनावणी घेण्याची विनंती केल्याने ही सुनावणी गुरुवारी पार पडू शकते.

कोर्टाच्या नोंदीनुसार, या याचिकेत व्हीसीकेचे संस्थापक टी. थिरुमावलवन आणि नॅशनल कॉन्फरन्सचे नेते सज्जाद अहमद किचलू यांच्या नावांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आता राहुल गांधींसह एकूण १३ दिग्गज विरोधी नेते या याचिकेत सहयाचिकाकर्ते बनले आहेत.

यापूर्वी १२ ऑक्टोबर रोजी ही याचिका दाखल केली असता, सुप्रीम कोर्टाच्या रजिस्ट्रीने १४ प्रकारच्या तांत्रिक त्रुटी काढल्या होत्या. यामध्ये प्रतिवादींच्या नावांतील चुका, इतर त्रुटी आणि कोर्ट फी कमी जमा करणे यांसारख्या बाबी होत्या.

या सर्व त्रुटी १३ ऑक्टोबर रोजी पूर्णपणे दुरुस्त करण्यात आल्या आहेत. विरोधी पक्षांनी दाखल केलेल्या या याचिकेत देशभरात लागू करण्यात आलेल्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या पद्धतीवर कठोर आक्षेप घेण्यात आले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्तांनी इतर निवडणूक आयुक्तांची संमती किंवा परवानगी न घेता एकतर्फी निर्णय घेतले, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

तसेच देशभरात एसआरए लागू करण्याबाबतच्या सर्व फायली, नोटिंग्स आणि अंतर्गत रेकॉर्ड्स सार्वजनिक करण्यात यावेत आणि सुप्रीम कोर्टाचा अंतिम निर्णय येईपर्यंत संपूर्ण देशात सुरू असलेले एसआरएचे काम तात्काळ स्थगित ठेवण्यात यावे, अशी आक्रमक मागणी राहुल गांधी आणि विरोधी नेत्यांनी केली आहे.

### थोडक्यात

## राज्यात उष्माघाताचा धोका!

**पुणे :** पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोबर महिन्यात उन्हाचा चटका वाढला आहे. हवामान विभागाच्या नोंदीनुसार गेल्या काही दिवसांत शहरात कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक नोंदविण्यात आले. वाढत्या तापमानामुळे नागरिकांना उकाड्याचा त्रास जाणवत असून, शरीरातील पाण्याची कमतरता, डोकेदुखी, चक्कर येणे आणि उष्णतेमुळे थकवा येण्यासारख्या समस्यांबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. उष्णतेशी संबंधित आजारांची लक्षणे ओळखून वेळेत उपचार घेणे महत्त्वाचे आहे. ऑक्टोबर महिन्यातील वाढत्या उष्णतेमुळे शरीरातून घामावाटे पाणी आणि क्षार बाहेर पडतात. पुरेसे पाणी न प्यायल्यास निर्जलीकरण होऊ शकते. तोंड कोरडे पडणे, लघवीचे प्रमाण कमी होणे, अशक्तपणा, डोकेदुखी आणि चक्कर येणे ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. उन्हात दीर्घकाळ काम करणा-या कामगारांना तसेच मैदानी खेळ खेळणा-या मुलांना उष्णतेचा अधिक त्रास होऊ शकतो. उष्णतेचा त्रास जाणवू लागल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये अशक्तपणा, चक्कर येणे किंवा लघवीचे प्रमाण कमी होणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा. उकाड्यामुळे त्वचेवर घामोळे, खाज आणि पुरळ येण्याचाही त्रास होऊ शकतो. घामामुळे त्वचा ओलसर राहिल्यास काही व्यक्तींमध्ये बुरशीजन्य संसर्गाची शक्यता वाढते. याशिवाय दूषित पाणी किंवा अन्नामुळे जुलाब, उलट्या आणि पोटदुखी यांसारखे पचनविकार उद्भवू शकतात. त्यामुळे स्वच्छ पाणी पिणे आणि ताजे अन्न खाणे महत्त्वाचे आहे.

# खाडीतील पाण्यात बुडून ४ मुलांचा मृत्यू



**वृत्तसंस्था, रत्नागिरी**

जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात अत्यंत हृदयद्रावक घटना घडली असून ४ मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची माहिती आहे. राजापूरच्या नाणार गावातील इंगळवाडी येथे खाडीत आईसोबत कालवे काढण्यासाठी गेलेल्या चार मुलांचा बुडून मृत्यू झाला. त्यापैकी एक मृतदेह अद्यापही सापडला नाही. या मृतदेहाचा शोध घेण्यासाठी पोलीस दलातर्फे तटरक्षक दलाच्या मदतीने आज दिवसभर शोध मोहीम राबवले गेले. मात्र, या मन हेलावणाऱ्या घटनेनं अख्ख्या गावावर शोककळा पसरली आहे.

नाणार येथील इंगळवाडी परिसरात राहणारे जुनेद भाटकर यांच्या पत्नी हिना भाटकर आपल्या मुलांसह दुपारी साडेतीनच्या सुमारास खाडीमध्ये मुळे आणि कालवे काढण्यासाठी गेल्या होत्या. आई-वडील खाडीपात्रात कालवे काढत असताना मुले पाण्याजवळ होती. दरम्यान, सायंकाळी साडेचारच्या सुमारास खाडीपात्रातील खोल खड्ड्याचा अंदाज न आल्याने पाचही मुले एकापाठोपाठ पाण्यात बुडू लागली. या दुर्घटनेत बुडालेली सर्व मुले ४ ते १५ वयाची असल्याची माहिती आहे.

सुदैवाने दुर्घटनेत एका मुलीला वाचविण्यात यश आलं. मात्र, या घटनेनं कुटुंबीयांसह संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. दरम्यान, बुडालेल्या ४ जणांपैकी एका मुलाचा मृतदेह अद्याप सापडला नसून प्रशासनाकडून शोधमोहीम सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर येथील खाडीत स्कुबा डायव्हर्स, काया किंग बोटी, तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर आणि तज्ञ यांच्या मदतीने ही शोधमोहीम दिवसभर राबवली गेली. पण, मृतदेह काही हाती लागला नाही. रत्नागिरी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नितीन बगाटे हे स्वतः या शोध मोहिमेमध्ये सहभागी झाले होते.

# मुस्कान-साहिलला फाशीची शिक्षा, निळा ड्रम हत्याकांड

**वृत्तसंस्था, मेरठ**

मेरठमध्ये प्रियकरासोबत मिळून पती सौरभ राजपूतची हत्या करणाऱ्या मुस्कानला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. तिचा प्रियकर साहिललाही न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली.

शिक्षा सुनावण्यापूर्वी तुरुंगात असलेल्या मुस्कान आणि साहिलला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जोडण्यात आले. मुस्कान रस्तोगी आणि साहिल ढसाढसा रडू लागले. न्यायाधीशांनी मुस्कानला विचारले- तू तुझा पती सौरभ राजपूतच्या हत्येप्रकरणी दोषी आहेस, तुला कोणती शिक्षा हवी आहे? तिने उत्तर दिले माझ्या मुलींची काळजी घेतली जावी. त्यानंतर ती शांत झाली. यानंतर साहिलला हाच प्रश्न विचारण्यात आला, मात्र तो गप्प राहिला.




शिक्षेची घोषणा झाल्यानंतर सौरभच्या आईला अश्रू अनावर झाले. त्या म्हणाल्या- शांतपणे न्याय मिळाला. सौरभ राजपूतची हत्या ३ मार्च २०२५ रोजी झाली होती. मृतदेहाचे ५ तुकडे करून तो निळ्या ड्रममध्ये भरला होता.

**फाशीची शिक्षा हीच योग्य शिक्षा होती : बबलू**

सौरभचा भाऊ बबलू म्हणाला, आम्हाला न्याय मिळेल अशी आशा होती. सुरुवातीपासूनच आमची एकच मागणी होती, ती म्हणजे फाशीची शिक्षा. त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे हे समजल्यावर आम्हाला खूप आनंद झाला आहे. जर त्यांनी अपील केले किंवा पुढील कायदेशीर पावले उचलली, तर आम्ही त्यालाही कायदेशीररीत्या विरोध करू. ज्यांनी हे कृत्य केले आहे त्यांना शिक्षा व्हावी आणि विशेषतः त्यांना फाशीची शिक्षा व्हावी अशी प्रार्थना आम्ही देवीकडे करत होतो. आमचा त्या व्यक्तीशी कोणताही संपर्क नाही; तिला परत स्वीकारण्याची किंवा तिच्याशी कोणतेही संबंध ठेवण्याची आमची इच्छा नाही. जरी आमच्यावर डीएनए चाचणीसाठी दबाव आणला गेला, तरी आमचे कुटुंब ती करण्यास नकार देईल.

**फाशीसह २० हजारांचा दंड**

सरकारी वकील विजय बहादूर यांनी सांगितले, साहिल आणि मुस्कान यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली असून, त्यांच्यावर २०,००० रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. शिक्षा सुनावल्यानंतर मुस्कान आणि साहिल दोघेही भावूक झाले आणि त्यांना हुंदके देऊन रडू कोसळले.

# भिवंडीत राजकीय भूकंप, समाजवादी पक्षाच्या ६ नगरसेवकांची पक्षातून हकालपट्टी

**वृत्तसंस्था, ठाणे**

जिल्ह्यातील भिवंडीमध्ये मोठा राजकीय भूकंप झाल्याचं पाहायला मिळत आहे. भिवंडी महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक निवडीवरून समाजवादी पक्षात मोठी खळबळ उडाली असून पक्षातील ६ नगरसेवकांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आलीय. भाजप आमदाराच्या निकटवर्तीय उमेदवारास स्वीकृत नगरसेवक पदासाठी पाठिंबा दिल्यामुळे पक्षनेतृत्वाने ही कारवाई केली आहे. त्यामुळे, भिवंडी निजामपूर महापालिकेतील समाजवादी पक्षाच्या ६ नगरसेवकांचे राजकीय भवितव्य धोक्यात आले असून पक्षाकडून ही कारवाई मागे घेण्यात येणार की त्यांचे निलंबन होणार हे पाहावे लागणार आहे.

पक्षाने दिलेला पक्षादेश डावलून भाजप आमदार महेश चौघुले यांचे समर्थक मानले जाणारे भरत जंगलानी यांच्या नावाची शिफारस स्वीकृत नगरसेवक पदासाठी केल्याचा आरोप करत समाजवादी पक्षाने सहा नगरसेवकांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. प्रदेशाध्यक्ष अबू आसिम आजमी यांच्या आदेशानुसार शहराध्यक्ष रियाज आजमी यांनी ही कारवाई जाहीर केली. हकालपट्टी करण्यात आलेल्या नगरसेवकांमध्ये गटनेते आरिब याकूब शेख, काशफी शाफ मोमिन, आजीब जमाल मोमिन, अन्सारी शबाना शमीम, शेख सलमाबानो मोहम्मद अक्रम आणि खान अमल उबैद यांचा समावेश आहे. स्वीकृत नगरसेवकपदाच्या निवडीवरून पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याने भिवंडीच्या राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. तर, भिंवडी महापालिकेतील राजकीय गणित आता नेमकं काय होणार, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

दरम्यान, भिवंडी महानगरपालिकेत नऊ स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीची घोषणा विशेष महासभेत महापौर नारायण चौधरी यांनी केली. त्यामध्ये काँग्रेसकडून इम्रान मोहम्मद एच.अन्सारी, अरफात ए. शेख,सलीम अहमद शेख तर भाजपाकडून सुगंधा टावरे, रवी सावंत, शिवसेनाकडून संजय काबुकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून गिरीश म्हात्रे, समाजवादी पक्षाकडून भरत जंगलानी आणि कोणार्क विकास आघाडीकडून मयूर विलास पाटील यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. या निवडीच्या घोषणेनंतर सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांनी निवड झालेल्या उमेदवारांचा जयघोष करीत शुभेच्छा दिल्या आहेत. उत्साही कार्यकर्त्यांनी मिरवणुका काढून आनंदोत्सवही साजरा केला.

# १३ वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार, धर्मांतरासाठी दबाव

**वृत्तसंस्था, नाशिक**

नाशिकमधील उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीशी प्रेमाचे नाटक करून तिच्यावर धर्मांतर करण्यासाठी सातत्याने दबाव आणल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी नोमाण अन्सारी या तरुणाने या चिमुकलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केले.

या प्रकरणी पीडित मुलीच्या कुटुंबाच्या तक्रारीवरून नाशिकच्या उपनगर पोलीस ठाण्यात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला मालेगाव येथून बेड्या ठोकल्या आहेत.



पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी नोमाण अन्सारी याने अल्पवयीन पीडितेचे लैंगिक शोषण केले. एवढेच नाही तर तिचे धर्मांतर करण्यासाठी तिला जबरदस्तीने हिजाब घालायला लावून नमाज पठण करायला लावले.

या सर्व प्रकारांचे आणि लैंगिक शोषणाचे फोटो व व्हिडीओ आरोपीने स्वतःच्या मोबाईलमध्ये शूट केले होते.

हे आक्षेपार्ह फोटो आणि नमाज पठणाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी आरोपी नोमाण पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबाला देत होता. आरोपीची अरेरावी एवढ्यावरच थांबली नाही, तर त्याने पीडित मुलीच्या कुटुंबालाही थेट धमकी दिली. "तुमच्या मुलीशी लग्न करून तिला दिल्लीला घेऊन जाईन आणि तिचे धर्मांतर करेन. जर तुम्ही विरोध केला, तर तुम्हालाही धर्मांतर करावे लागेल, अन्यथा सर्व फोटो आणि व्हिडीओ इंटरनेटवर व्हायरल करेन," अशी धमकी आरोपीने दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या घटनेमुळे नाशिकमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. उपनगर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी नोमाण अन्सारी याला मालेगाव येथून ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी आरोपीचा आणि पीडित मुलीचा मोबाईल जप्त केला असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना ५ हजार, मंत्रिमंडळाचा निर्णय

**वृत्तसंस्था, मुंबई**

महाराष्ट्रात दुष्काळाच्या झळा पाहायला मिळत आहेत. याचपार्श्वभूमीवर बुधवार दि. १४ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृहावर मंत्रिमंडळाची विशेष बैठक बोलावली होती. या बैठकीत दिवाळी आधी ५ हजार रुपये शेतकऱ्यांना ॲडवान्स देण्याचा निर्णय घेण्यात आला असून कर्जमाफी तथा दुष्काळाच्या नुकसान भरपाई पोटी शेतकऱ्यांची फक्त ५ हजार रुपयांनी बोळवण करण्याचा घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना केली.

दुष्काळ नोव्हेंबर शेवटी जाहीर होतो. मात्र परिस्थिती बघता आपण ॲडव्हासमध्ये दुष्काळ जाहीर केला आणि दुष्काळाबात जीआर ऑक्टोबर महिन्यात काढला. आम्हाला कल्पना आहे दिवाळी येते आहे, दिवाळी अडचणीची आहे. दुष्काळाची कार्यप्रणाली दिवाळीआधी पूर्ण होणे कठीण आहे. दिवाळीआधी सगळी कामे होऊ शकत नाही. मात्र एकूणच सगळ्या गोष्टी विचारात घेता, आज मंत्रिमंडळाशी चर्चा केली आणि दिवाळी आधी ५ हजार रुपये शेतकऱ्यांना अग्रीम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिवाळीआधी ५ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील. सुमारे एक ते सव्वा कोटी शेतकऱ्यांना मिळणार थेट खात्यात पैसे जमा होतील. ही अग्रीम मदत सुमारे ६००० कोटी रुपयांची असणार आहे असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राज्यात आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. आता राज्यात एकूण ३०५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांत १२ सवलती मिळत राहतील. कर्जमाफीचे पैसेही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहेत. पिण्याचे पाणी देणाऱ्या टँकर्सची संख्या वाढतेय.

मराठवाड्यात पाणीपातळी ३ मीटरपेक्षा खाली गेली आहे. मराठवाड्यात हवे तेवढे टँकर देण्याचा निर्णय झाला आहे. पाण्याच्या टँकरचे जीपीएसद्वारे ट्रॅकिंग होणार असल्याची माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली. तसेच १६ हजार बेकायदा कनेक्शन आम्ही तोडलीयत. पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यास प्राधान्य आहे, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

**आतापर्यंत ३०५ तालुके दुष्काळग्रस्त**

- दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रुपये ॲडव्हान्स देणार
-मराठवाड्यात भूजल पातळी ३ मीटरने खालावली, पिण्याच्या पाण्याचे टँकर वाढवणार
-१६ हजार अनधिकृत कनेक्शन कापले
-शैक्षणिक फी माफीच्या जीआरमधून अटी-शर्ती हटवल्या
-वीज बिलांसाठी कोणताही तकादा नाही, अतिउत्साह दाखवल्यास कारवाई
-कर्जवसुलीसाठीही बँकांनी अतिउत्साह दाखवू नये, खासगी बँका, मायक्रो फायनान्स कंपन्यांशी चर्चा करणार
-शेतकऱ्यांनी चारा किंवा चारा लागवड पीकं घ्यावीत, राज्य सरकार तो विकत घेणार.

संपादकीय लेखणीतून...

## इंडिया आघाडीची 'वर'चढ

मतचोरीचे आरोप आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी गत काही दिवसांपासून जंतरमंतर येथे सुरू असलेल्या निदर्शनानंतर सोमवारी हे संपूर्ण प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सोमवारी मोठ्या पोलिस बंदोबस्तात आणि कडेकोट बॅरिकेड्स तोडत सर्वोच्च न्यायालयापर्यंत लोकशाहीसाठी मार्च काढला. या मोर्चादरम्यान विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल फेरपडताळणी (एसआयआर) मोहिमेतील कथित अनियमितता आणि मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात संयुक्त याचिका दाखल केली. एसआयआर प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणावर नावे वगळण्यात आल्याचा आणि त्यात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. भगवान दास रोडवर पोलिसांनी हा मोर्चा अडवल्यानंतर राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि अखिलेश यादव यांच्यासह अनेक नेते वाहनावर चढले आणि बॅरिकेड्स पार करून पुढे गेले. यावेळी कार्यकर्त्यांनी सरकार आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना राजीनामा देण्याचे आणि माफीचा साक्षीदार बनण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, तुमच्याकडून चूक झाली आहे, पण यामागचे खरे सूत्रधार वेगळे आहेत.

हा लढा इथेच थांबणार नाही. दिवस असो किंवा वर्ष, आमचा संघर्ष सुरूच राहील. निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता, मतदार याद्यांमधील त्रुटी आणि स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन प्रक्रियेवरून ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंजूर केल्या आहेत. न्यायालयाने या सर्व याचिका एकत्र करून यावर येत्या २७ ऑक्टोबर रोजी सुनावणी घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधु आणि विवेक जोशी यांना या प्रकरणात प्रतिवादी बनवण्यात आले आहे. विरोधी पक्षांचे प्रमुख नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, संजय राऊत, सुप्रिया सुळे, एम. ए. बेबी, डी. राजा, महुआ माझी, सौगत रॉय आणि ई. टी. मोहम्मद बशीर या ११ प्रमुख नेत्यांचा याचिकाकर्त्यांमध्ये समावेश आहे. तत्पूर्वी, मतचोरीच्या आरोपांवर चर्चा करण्यासाठी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी राहुल गांधी यांची भेट घेण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयात या मुद्यांशी संबंधित प्रकरणे आधीच न्यायप्रविष्ट असल्याने ही भेट नाकारण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. मोर्चात काँग्रेसचे सचिन पायलट, शशी थरूर, कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुकू, तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी, योगेंद्र यादव उपस्थित होते. दिल्ली पोलिसांच्या मनात नेमके काय चालले आहे, हेच कळत नाही. ही संपूर्ण परिस्थिती पाहता, देश आणीबाणीच्या दिशेने चालला आहे की काय, अशी भीती आणि भावना आज अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे. देशात पारदर्शक निवडणुका झाल्याच पाहिजेत. ज्ञानेश कुमार यांनी नैतिकतेच्या आधारावर त्वरित राजीनामा दिला पाहिजे, असे खा. सुप्रिया सुळे म्हणाल्या. अनेक राजकीय आंदोलनांचे साक्षीदार असलेले दिल्लीतील जंतरमंतर हे आंदोलनासाठी निश्चित केलेले ठिकाण दिल्ली पोलिसांनी आता यादीतून वगळले असून, राजधानीत आंदोलन करण्यासाठी तीन पर्यायी ठिकाणे जाहीर केली आहेत.

त्यामुळे आता जंतरमंतरवर धरणे किंवा आंदोलन करण्यास परवानगी दिली जाणार नाही. गृह मंत्रालयाच्या एका अधिकृत आदेशानुसार आंदोलनासाठी तीन नवीन ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. मागील काही महिन्यांत झालेल्या सलग आंदोलनांमुळे सरकारी यंत्रणांचे केंद्र असलेल्या नवी दिल्ली जिल्ह्यात वाहतूक आणि जनजीवन विस्कळीत झाले होते. दिल्लीचे पोलिस आयुक्त अनुराग कुमार यांनी ११ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या नवीन आदेशानुसार आता आंदोलने आणि निदर्शनांसाठी रामलीला मैदान, बुराडी ग्राऊंड आणि सीबीडी ग्राऊंड (पूर्व दिल्ली) या तीन नवीन जागांची घोषणा करण्यात आली आहे. जंतरमंतर हे निदर्शनांसाठी बंद करण्यात आल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मंगळवारी (१३ ऑक्टो.) सुनावणी करण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने तयारी दाखवली आहे. जंतरमंतर हे निदर्शनांचे अधिकृत ठिकाण रद्द करण्याच्या निर्णयावर टीका करताना अभिजित दिपके म्हणाले, पंतप्रधान मोदी एक दिवस लोकशाहीच रद्द करतील आणि संपूर्ण देशच जंतरमंतर बनून जाईल.

# जंतर-मंतर ते रामलीला: लोकशाहीचे 'बदलते' अंतर आणि 'आर्थिक कोंडी'

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

जंतर-मंतर ते रामलीला मैदान हे केवळ दिल्लीतील दोन भौगोलिक ठिकाणे नाहीत, तर ते भारतीय लोकशाहीतील आंदोलनाचे बदललेले चरित्र आणि अंतर दर्शवतात. एका काळी संसदेच्या अगदी जवळ असलेल्या जंतर-मंतरवरून सुरू होणारा जनतेचा आवाज आता तिथून साधारण ४-५ किलोमीटर दूर असलेल्या रामलीला मैदानावर ढकलला गेला आहे. हे अंतर केवळ किलोमीटरचे नाही, तर लोकशाहीत सर्वसामान्यांच्या आंदोलनांना मिळणाऱ्या जागेचे आणि बदलत्या स्वरूपाचे आहे.

लोकशाहीत आपला आवाज सरकारपर्यंत पोहोचवण्याचे सर्वात प्रभावी आणि जिवंत माध्यम म्हणजे जनआंदोलन. गेल्या अनेक दशकांपासून देशाच्या राजधानीत, दिल्लीतील जंतर-मंतर हे अशाच असंख्य आंदोलनांचे, उपोषणांचे आणि राजकीय स्थित्यंतरांचे मूक साक्षीदार राहिले आहे. मात्र, ११ ऑक्टोबर रोजी दिल्ली पोलीस आयुक्तांनी जारी केलेल्या नव्या आदेशानुसार, हे ऐतिहासिक चित्र आता कायमचे बदलले आहे. वाढती वाहतूक कोंडी, सुरक्षेचे प्रश्न आणि शहरातील प्रशासकीय व्यवस्थेवर पडणारा प्रचंड ताण या कारणास्तव जंतर-मंतरवर आंदोलनांना पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. या नव्या धोरणानुसार आता दिल्लीत निदर्शने आणि मोर्चांसाठी रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि पूर्व दिल्लीतील सीबीडी मैदान हे केवळ ३ पर्याय निश्चित करण्यात आले आहेत. वरवर पाहता हा केवळ एका जागेचा बदल वाटत असला, तरी राजधानीतील आंदोलनांच्या संस्कृतीत आणि राजकीय अभिव्यक्तीमध्ये होणारा हा एक अतिशय दूरगामी आणि मोठा बदल ठरणार आहे.

या प्रशासकीय निर्णयामागील मुख्य युक्तिवाद असा आहे की, जंतर-मंतर हे नवी दिल्लीच्या अतिशय मध्यवर्ती भागात येते आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे मार्ग येथून अगदी जवळ आहेत. परंतु, या प्रशासकीय सोयीच्या युक्तिवादाखाली लोकशाहीचा एक अत्यंत महत्त्वाचा दुवा निखळत चालला आहे. जंतर-मंतरचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे भौगोलिक स्थान. सत्तेच्या केंद्रस्थानी असल्यामुळे, येथून उठणारा आवाज थेट राज्यकर्त्यांच्या कानावर पडतो. आता आंदोलनांना बुराडी किंवा सीबीडी ग्राउंडसारख्या शहराच्या सीमेवर असलेल्या ठिकाणी हलवणे, म्हणजे हा थेट संवाद मोडून काढण्यासारखे आहे. आंदोलनाचा मुख्य उद्देश आपला प्रश्न सरकार आणि देशासमोर मांडणे हा असतो. जंतर-मंतर हे मध्यवर्ती असल्यामुळे प्रसारमाध्यमे आणि नागरिकांचे लक्ष तिथे सहज वेधले जाते. याउलट, शहराच्या वेशीवर असणाऱ्या दूरवरच्या ठिकाणी होणाऱ्या आंदोलनांकडे देशाचे लक्ष वेधले जाणे अत्यंत कठीण होईल. 'दृष्टीआड सृष्टी' या न्यायाने, आंदोलन जर कोणाला दिसलेच नाही, तर सत्ताधारी त्याची दखल घेतील का, हा एक अतिशय गंभीर प्रश्न आहे.

आता या भौगोलिक अंतरासोबतच प्रशासनाने आंदोलकांची मोठी आर्थिक कोंडीदेखील केली आहे. जंतर-मंतरवर आंदोलनांवर बंदी घातल्यानंतर आता रामलीला मैदानावर आंदोलन करण्यासाठी आयोजकांना मोठा खिसा रिकामा करावा लागणार आहे. महापालिकेच्या बागवानी विभागाद्वारे चालवल्या जाणाऱ्या १२ एकराच्या या मैदानात सुमारे ५० हजार लोक एकत्र येऊ शकतात, मात्र त्याचे भाडे आंदोलकांचे कंबरडे मोडणारे आहे. रामलीला मैदानाचा प्रतिदिन बुकिंगचा दर ५० हजार रुपये आहे, तर ५५ हजार रुपये अनामत रक्कम म्हणून जमा करावी लागते. त्यावर लागणाऱ्या वेगवेगळ्या करांसह एका दिवसाच्या बुकिंगचा प्राथमिक खर्च थेट १.२१ लाख रुपयांच्या घरात जातो. एवढा मोठा खर्च करूनही हे मैदान सहजासहजी उपलब्ध नाही.

आगामी दसरा आणि दिवाळीसारख्या सणांमुळे पुढील अडीच महिने हे मैदान पूर्णपणे बुक असून, वर्षभरात केवळ २९, ३० आणि ३१ डिसेंबर हे ३ दिवसच बुकिंगसाठी रिकामे आहेत. महापालिकेने मैदानातील एक अत्यंत लहान भाग आंदोलनासाठी मोफत उपलब्ध ठेवला असला, तरी तिथे एकावेळी केवळ १५० लोकांनाच जमण्याची परवानगी आहे आणि त्यासाठी आधी दिल्ली पोलिसांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आणण्याची मोठी जाचक अट घालण्यात आली आहे.

रामलीला मैदानावर लादण्यात आलेले हे आर्थिक निर्बंध त्याच्या ऐतिहासिक परंपरेशी पूर्णपणे विसंगत आहेत. या मैदानाची निर्मिती आणि इतिहास अतिशय वैशिष्ट्यपूर्ण राहिला आहे. १९३० पर्यंत हे मैदान एक मोठा तलाव होते, जो बुजवून सपाट करण्यात आला आणि १९३२ पासून तिथे रामलीला सादरीकरण सुरू झाले. याच मैदानाने भारतीय राजकारणातील अनेक मोठी वादळे पाहिली आहेत. १९५२ मध्ये जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी येथूनच सत्याग्रह सुरू केला होता, तर १९५६ आणि १९५७ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी येथे भव्य सभांना संबोधित केले होते. १९६२ मध्ये ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ द्वितीय यांच्या स्वागतासाठी येथे कायमस्वरूपी व्यासपीठ उभारण्यात आले. १९७१ च्या पाकिस्तानवरील विजयानिमित्त इंदिरा गांधी यांची सभा, १९७५ मधील आणीबाणीच्या दिवशी जयप्रकाश नारायण व अटलबिहारी वाजपेयी यांची ऐतिहासिक क्रांती सभा आणि २०१३ मध्ये अरविंद केजरीवाल यांचा मुख्यमंत्रिपदाचा शपथविधी याच मैदानावर पार पडला. असा भव्य ऐतिहासिक आणि लोकशाहीचा वारसा लाभलेले मैदान आता पैशांच्या भिंतीआड बंदिस्त करण्यात आले आहे.

वाहतूक कोंडी आणि सुरक्षेचा ताण ही कारणे प्रशासकीय दृष्टिकोनातून योग्य वाटत असली, तरी लोकशाहीत नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यापेक्षा ती मोठी असू शकत नाहीत. आंदोलने ही मुळातच प्रस्थापित व्यवस्थेला अस्वस्थ करण्यासाठी असतात. जंतर-मंतरवर कोणत्याही खर्चाविना आणि थेट सत्तेला जाब विचारणाऱ्या संघटनांसाठी आता रामलीला मैदानाचे हे भरमसाठ शुल्क, कडक नियम आणि बुराडीसारख्या मैदानांचे वाढलेले अंतर यामुळे आंदोलनाचा मार्ग अत्यंत खडतर झाला आहे. सत्तेचे केंद्रीकरण आणि सुरक्षेच्या नावाखाली घातले जाणारे हे नवे अडथळे सत्ता आणि सामान्य जनता यांच्यातील वाढत्या दरीचे प्रतिनिधित्व करतात. जंतर-मंतरवरून आंदोलने हद्दपार होणे हे दिल्लीच्या राजकीय संस्कृतीच्या एका युगाचा अंत आहे. दिल्लीच्या रस्त्यांवरील संघर्षाचे आणि खुर्चीच्या राजकारणाचे नवे अध्याय आता सत्तेच्या उंबरठ्यावर नव्हे, तर पैशांची किंमत मोजून शहराच्या वेशीवर लिहिले जातील.

- ९५६१५९४३०६

# अफगाणिस्तानने बांगलादेशच्या विजय पळविला!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

अफगाणिस्तानने बांगलादेशविरुद्धचा कसोटी सामना अनिर्णित राखला. अबू धाबी येथे, अफगाणिस्तानने दुसऱ्या डावात १४२ षटके फलंदाजी करत ८ गडी गमावून ३४६ धावा केल्या. पहिल्या डावात १०६ धावांची आघाडी घेतल्यानंतर, बांगलादेशने आपला दुसरा डाव ७ गडी गमावून ३७२ धावांवर घोषित केला आणि अफगाणिस्तानसमोर ४७९ धावांचे लक्ष्य ठेवले. सेदिकुल्ला अटलने मंगळवारी शतक झळकावले. त्याने १११ धावा केल्या.

### अटल ८ तास आणि ३४ मिनिटे फलंदाजीला होता

सेदिकुल्ला ८ तास आणि ३४ मिनिटे फलंदाजीला होता. त्याने आपल्या शतकात ९ चौकार आणि ३ षटकार मारले. कसोटी सामन्याच्या चौथ्या डावात एखाद्या अफगाण फलंदाजाने केलेले हे पहिले शतक होते. अटलने सुरुवातीला संयम राखण्यावर आणि विकेट वाचवण्यावर लक्ष केंद्रित केले. बांगलादेशच्या गोलंदाजांनी दबाव कायम ठेवला, पण त्याने एक मोठी खेळी खेळली. सेदिकुल्लाहने ३३२ चेंडूंचा सामना केला.

अटलला कर्णधार रहमत शाहची साथ मिळाली. रहमतने दुसऱ्या डावात १२४ चेंडूंमध्ये ५१ धावा केल्या. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ८२ धावांची भागीदारी केली. त्यानंतर हशमतुल्ला शाहिदीने ३६ आणि यष्टीरक्षक इक्राम अलीखिलने ३३ धावा करून अफगाणिस्तानच्या आशा जिवंत ठेवल्या. अटल बाद झाल्यानंतरही अफगाणिस्तानने हार मानली नाही. यामिन अहमदझाईने ८५ चेंडूंमध्ये १९ धावा आणि कैस अहमदने ८० चेंडूंमध्ये नाबाद ४९ धावा करून सामना अनिर्णित राखला.

### बांग्लादेशने शेवटच्या तासात संधी गमावली

सामन्याच्या शेवटच्या दिवशी अफगाणिस्तानला बाद करण्यासाठी बांगलादेशकडे संपूर्ण दिवस होता. संघाने दुसऱ्या डावात १४२ षटके टाकली, पण शेवटच्या दोन विकेट घेण्यात ते अपयशी ठरले. अंतिम सत्रात झेल आणि धावबाद करण्याच्या संधी गमावणे बांगलादेशला महागात पडले.

बांगलादेशचा कर्णधार नाझमुल होसेन शांतोने कबूल केले की, गोलंदाजांनी संधी निर्माण केल्या पण त्यांचे विकेट्समध्ये रूपांतर करण्यात अपयशी ठरल्यामुळे त्यांचा संघ निराश झाला होता. तो म्हणाला की, अफगाणिस्तानने उत्कृष्ट फलंदाजी केली आणि त्याच्या संघाला या सामन्यातून शिकण्याची गरज आहे.

अफगाणिस्तानचा कर्णधार रहमत शाहने सामना अनिर्णित राहिल्याला विजयच म्हटले. तो म्हणाला की, संघाने पाच दिवसांत फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये आपल्या योजनेची अंमलबजावणी केली.

अफगाणिस्तानने बांगलादेशविरुद्धचा पराभूत कसोटी सामना अनिर्णित राखला. अबू धाबीमध्ये अफगाणिस्तानने दुसऱ्या डावात १४२ षटके फलंदाजी करत ८ गडी गमावून ३४६ धावा केल्या. पहिल्या डावात १०६ धावांची आघाडी घेतल्यानंतर बांगलादेशने आपला दुसरा डाव ७ गडी गमावून ३७२ धावांवर घोषित केला आणि अफगाणिस्तानसमोर ४७९ धावांचे लक्ष्य ठेवले. सेदिकुल्ला अटलने मंगळवारी शतक झळकावले. त्याने १११ धावा केल्या. कैस अहमदने दिवसाच्या शेवटच्या चेंडूवर षटकार मारला आणि तो ४९ धावांवर नाबाद राहिला

### सेदिकुल्लाहने ३३२ चेंडूंचा सामना केला

अटलला कर्णधार रहमत शाहची साथ मिळाली. रहमतने दुसऱ्या डावात १२४ चेंडूंमध्ये ५१ धावा केल्या. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ८२ धावांची भागीदारी केली. त्यानंतर हशमतुल्ला शाहिदीने ३६ आणि यष्टीरक्षक इक्राम अलीखिलने ३३ धावा करून अफगाणिस्तानच्या आशा जिवंत ठेवल्या. अटल बाद झाल्यानंतरही अफगाणिस्तानने हार मानली नाही. यामिन अहमदझाईने ८५ चेंडूंमध्ये १९ धावा आणि कैस अहमदने ८० चेंडूंमध्ये नाबाद ४९ धावा करून सामना अनिर्णित राखला.

### पहिल्या डावात रहमत शाहचे शतक

बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली आणि ९२.३ षटकांत ३४६ धावा केल्या. तन्झिद हसन तमीमने ७१ चेंडूंमध्ये ८३ धावा केल्या, तर शादमन इस्लामने १११ चेंडूंमध्ये ६७ धावा केल्या. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी १२४ धावा जोडल्या. मुमिनुल हकने ३९ धावा केल्या आणि लिटन दासने ८९ चेंडूंमध्ये ५३ धावांचे योगदान दिले. खालच्या फळीत, नयिम हसन ३५ धावांवर नाबाद राहिला. अफगाणिस्तानकडून, मोहम्मद सलीम साफीने ८२ धावांत चार बळी घेतले. यामीन अहमदझाईने तीन बळी आणि इस्मत आलमने दोन बळी घेतले.

प्रत्युत्तरात, अफगाणिस्तानचा पहिला डाव ८९.१ षटकांत २४० धावांवर आटोपला. कर्णधार रहमत शाह संघर्ष करत २१६ चेंडूंमध्ये १०५ धावा करू शकला. अब्दुल मलिकने १२० चेंडूंमध्ये ६२ धावा केल्या. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ७० धावा जोडल्या, परंतु उर्वरित फलंदाज मोठी भागीदारी करू शकले नाहीत. बांगलादेशच्या हसन महमूदने पाच बळी घेतले आणि हॅट-ट्रिकही घेतली. इबादत होसेनने चार बळी घेतले.

### रहमत शाहने कर्णधारपदाच्या पदार्पणातच शतक झळकावले

लिटन दासच्या शतकामुळे बांगलादेशने ३७२/७ धावांवर डाव घोषित केला. दुसऱ्या डावात, बांगलादेशने १०५.२ षटकांत ३७२/७ धावांवर डाव घोषित केला. लिटन दासने ११७ चेंडूंमध्ये १४ चौकारांसह १०२ धावा केल्या. कर्णधार नाझमुल होसेन शांतोने १९१ चेंडूंमध्ये ८२ धावा आणि मुशफिकुर रहीमने १४८ चेंडूंमध्ये ८१ धावा केल्या. मेहिदी हसन मिराज ९७ चेंडूंमध्ये ५२ धावांवर नाबाद राहिला. शांतो आणि मुशफिकुर यांनी चौथ्या विकेटसाठी १५९ धावांची भागीदारी केली. त्यानंतर लिटनने मेहिदीसोबत सातव्या विकेटसाठी १४९ धावा जोडल्या. या खेळीमुळे बांगलादेशला

### अफगाणिस्तानसमोर ४७९ धावांचे मोठे लक्ष्य ठेवण्यास मदत झाली

अफगाणिस्तानकडून यामिन अहमदझाई आणि मोहम्मद सलीम साफी यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. झिया-उर-रहमान अकबरने दोन बळी घेतले, तर कैस अहमदने एक बळी घेतला.

### लिटन दासची नेत्रदिपक कामगिरी

लिटन दासला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले, तसेच त्याने यष्टीरक्षणात एक विक्रमही प्रस्थापित केला. सामन्यातील ५३ आणि १०२ धावांच्या खेळीसह यष्टीमागे आठ झेल घेतल्याबद्दल लिटन दासला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. या सामन्यात त्याने कसोटी सामन्यात १५० धावा करण्याचा आणि यष्टीरक्षक म्हणून नऊ बळी घेण्याचा विक्रम प्रस्थापित केला. असे करणारा तो पहिला यष्टीरक्षक ठरला.

हा कसोटी सामना डब्ल्यूटीसीचा भाग नसला तरी बांगलादेश, अफगाणिस्तान पेक्षा आयसीसी मानांकनात वर आहे. त्यामुळे त्यांनी हा पराभव केवळ वाचविला नसून जवळजवळ नैतिक विजयच मिळविला आहे. या सामन्यातील लढावू खेळामुळे अफगाणी खेळाडूंचा आत्मविश्वास नक्कीच वाढला अजून भविष्यात त्यांच्यासाठी ही कामगिरी नक्कीच टॉनिकचं काम करेल !

- ९०९६३७२०८२

# खासगी कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन वाढवावे!

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

खासगी आस्थापना तसेच कारखानदारी मध्ये आयुष्य घालवलेल्या श्रमिकाला उतरत्या वयात ईपीएस ९५ अंतर्गत केवळ १००० ते ३००० पर्यंत निवृत्ती वेतन मिळत असल्याचे सत्य वारंवार वृत्तपत्रांतून प्रकट होत असते. एकीकडे सरकारी नोकरदाराला वेतन तर वेतन आणि निवृत्ती वेतन सुद्धा भरमसाठ असते. ( तो त्यांचा हक्क आहे) तर दुसरीकडे खासगी आस्थापनांत तुटपुंज्या वेतनावर गुजरान करणाऱ्या कामगारांना निवृत्त झाल्यावर जर इतके अत्यल्प वेतन मिळत असेल तर त्याने आयुष्याचा उत्तरार्ध कसा काढावा? हा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून खासगी आस्थापनांतील कामगारांना सतावतो आहे. यात वाढ व्हावी म्हणून कामगारांनी हा प्रश्न अनेकदा रेटून धरला असला तरीही, यात अजून पर्यंत यश न येणे म्हणजे शासनाची उदासीनता म्हणावी की कामगार संघटनांची हार, ही विचार करण्यालायक बाब आहे.




खासगी आस्थापनांत आयुष्य वेचतांना अनेकांना अत्यल्प वेतनावर काम करावे लागते. एकतर बेरोजगारी आणि दुसरे खासगी आस्थापनांची पिळवणूक त्यातल्या त्यात नोकरीची नसणारी शाश्वती अशा तिहेरी कात्रीत सापडलेला कामगार आयुष्यभर कष्ट करूनही उत्तरार्धात सुखाचे जीवन जगू शकेल इतकी कमाई करू शकत नाही. वृद्ध माता पित्यांचा खर्च, मुलांचा शैक्षणिक खर्च करता करता निवृत्तीनंतर त्याचेजवळ कुठली जमापुंजी जुळणार?

निवडणूक आली की प्रत्येक पक्ष नको त्या घोषणा करतात आणि निवडून आल्यावर जनतेला फुकटच्या योजना बहाल करतात. श्रम न करता अनेकांवर घरबसल्या कोट्यवधी रुपयांची उधळण केल्या जाते. कर्जाच्या ओज्याखाली दबलेल्या कारखानदारांना कर्जात सवलत देतात. प्रसंगी कर्जमाफी देतात आणि जे कामगार कष्ट करून आपला उदरनिर्वाह चालवतात, त्यांच्याकडे असे दुर्लक्ष करतात. हा दूजाभाव कशाला? आज साधे सुरक्षा गार्ड म्हणून जर कुणी कुठल्या आस्थापनेत नियुक्त असेल तर त्याला बारा बारा तास राबवून देखील पंधरा ते अठरा हजारांच्या वर वेतन मिळत नाही. मग,त्यांनी काय खावं आणि काय वाचवावं? हा प्रश्न आयुष्यभर सतावत असतो.

एखाद्या कारखानदारीत आयुष्य घालवलेला कामगार उतरंडीला थकून जातो. अनेक व्याधींनी त्याला घेरलेले असते. निवृत्ती वेतन म्हणून मिळालेला हा अल्प पैसा त्यांच्या वैद्यकीय उपचारांना देखील पुरत नसतो. मग, अशावेळी इतर दैनंदिन गोष्टींचे काय? हा प्रश्न उभा ठाकतो. जर शासकीय नोकरदारांना आज चाळीस हजार निवृत्ती वेतन मिळत असेल तर खासगी कर्मचाऱ्यांना निदान दहा हजार तर मिळायला हवे ना! खासगी कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन साडे सात हजारांपर्यंत वाढवा म्हणून कितीतरी वर्षांपासून कामगार लढतो आहे. मात्र, सत्तेवर येणाऱ्या प्रत्येक पक्षाने कामगारांच्या तोंडाला नेहमीच पाने पुसली आहेत. वाढती महागाई आणि नाना बिमाऱ्यांच्या वाढता आलेख बघता खासगी आस्थापनांत हयात घालवलेल्या कर्मचाऱ्यांचा उत्तरार्ध सुखकर व्हावा याकरिता त्यांचे निवृत्ती वेतन वाढवणे अत्यंत गरजेचे आहे.

- ८४१२८७७२२०

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# भटक्या विमुक्त समाजाचा निवासाचा प्रश्न मार्गी !

## केवळ १ रुपयात निवासासाठी जागा देण्याचा प्रस्ताव, स्वतंत्र बजेट आणि मेंढपाळ चराई धोरणावर चर्चा, कामचुकार अधिकाऱ्यांवर महसूलमंत्र्यांची नाराजी

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
भटक्या विमुक्त समाजाच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी सरकार नाममात्र १ रुपयात जागा उपलब्ध करुन देणार आहे. त्यासाठी प्रस्ताव तातडीने तयार करुन मंत्रिमंडळासमोर आणण्याचे निर्देश ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

दरम्यान, बैठकीत दिलेल्या सूचना गांभीर्याने न घेणाऱ्या आणि कामचुकारपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्हीजेएनटी) आणि विशेष मागास प्रवर्गाच्या (एसबीसी) सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी गठित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची सातवी बैठक येथील सह्याद्री अतिथीगृहावर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीला अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पर्यावरण व वातावरणीयबदल मंत्री पंकजा मुंडे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले, पालावर आणि तात्पुरत्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या भटक्या-विमुक्त समाजाच्या नागरिकांना जात प्रमाणपत्रे व इतर दाखले देण्यात यावेत. तसेच त्यांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी आणि नवीन वसाहती निर्माण करण्यासाठी जागांचा प्रस्ताव तातडीने तयार करुन द्यावा. "अधिकारी बैठकीतील सूचना गांभीर्याने घेत नाहीत, इतर मागास बहुजन कल्याण विभाग मागे पडत आहे आणि आवश्यक ते प्रस्ताव वेळेत सादर केले जात नाहीत. १ रुपयात जागा उपलब्ध करून देऊनही प्रस्तावच दिले गेले नाहीत," अशा शब्दांत त्यांनी ताशेरे ओढले. ज्या ठिकाणी जागा नाहीत त्याठिकाणच्या जागांचे प्रस्ताव २९ ऑक्टोबरपर्यंत कोणत्याही परिस्थितीत सादर करण्याचे कडक आदेश त्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

राज्यातील मेंढपाळ बांधवांच्या चराई क्षेत्राच्या प्रश्नावर बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. महसूल व वन विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील २१ वनविभागांमध्ये जून ते सप्टेंबर या काळात मेंढी चराईसाठी कायदेशीर परवानगी देण्यात आली आहे; तर वनक्षेत्र उपलब्ध नसलेल्या उर्वरित २७ वनविभागांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार चराईसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर वनमंत्री गणेश नाईक यांनी दुष्काळी परिस्थितीत चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण होत असल्याने सर्व अधिकाऱ्यांनी ड्रोन सर्व्हे करून चाऱ्याची उपलब्धता तपासावी आणि डीपीडीसीच्या निधीतून चारा उपलब्ध करून द्यावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना केली. तसेच नोकरभरतीतील ९ टक्के अनुशेष आणि आर्थिक असमानता दूर करण्यासाठी उपसमितीने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणीही त्यांनी मांडली.

'महाज्योती' (महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था) आणि इतर मागासवर्गीय महामंडळांच्या निधीवाटपावर जोरदार चर्चा झाली. सध्या महाज्योतीमार्फत ५९% ओबीसी, १०% विमुक्त जाती, २५% भटक्या जमाती (ब, क, ड) आणि ६% विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लाभ दिला जात आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी 'सारथी' संस्थेला १,४८४ कोटी रुपये मिळत असताना 'महाज्योती'ला केवळ २८८ कोटी रुपये मिळत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. सर्व संस्थांना निकषानुसार समान निधी मिळायला हवा, 'एकाला तुपाशी आणि एकाला उपाशी' अशी भूमिका चालणार नाही, असे सांगत त्यांनी आधी मंजूर केलेला सर्व निधी तातडीने वितरित करण्याची मागणी केली. यावर महसूल मंत्री बावनकुळे यांनी ६०० कोटी रुपयांच्या बजेटमधील सर्व पैसे वितरित झाले असल्याचे सांगत, कोणत्याही परिस्थितीत अर्थसंकल्पीत निधी कमी केला जाणार नाही आणि याप्रकरणी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून अतिरिक्त निधीचे नियोजन केले जाईल, असे आश्वस्त केले. तसेच व्हिजेएनटी प्रवर्गासाठी स्वतंत्र बजेट तयार करण्याचा प्रस्तावही बैठकीत मांडण्यात आला.

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी ओबीसी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाबाबत स्पष्ट भूमिका मांडत, ओबीसी वसतिगृहे क्लब (एकत्र) करू नयेत. कार्यालयीन जागा आणि विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था स्वतंत्र असावी, असे निर्देश दिले. तसेच विभाग मागे राहिल्यास त्यास संबंधित विभागच जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला. सध्या महामंडळ आणि उपकंपन्यांसाठी नवी मुंबईतील सिडको बेलापूर रेल्वे स्थानक संकुलात ११,४५५ चौ. फूट जागा खरेदीची कारवाई अंतिम टप्प्यात असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

## बल्लारपुरात आजपासून रंगणार रंगताली गरबा उत्सव: हजारो रुपयांच्या बक्षिसांची लयलूट



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**
नवरात्रोत्सवाच्या उत्साहाला रंगताली गरबा उत्सवाची रंगत लाभणार असून, बल्लारपूर शहरातील महिला महाविद्यालयाच्या पटांगणात, संत तुकाराम महाराज हॉलजवळ १४, १५ आणि १६ ऑक्टोबर रोजी भव्य गरबा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, विजेत्या स्पर्धकांना हजारो रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. त्यामुळे गरबाप्रेमींसाठी हा उत्सव विशेष आकर्षण ठरणार आहे.

या गरबा उत्सवाचे उद्घाटन बल्लारपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा अल्का वाढई यांच्या हस्ते पूजा-अर्चना करून करण्यात येणार आहे. डॉ. रजनी हजारे यांच्या नेतृत्वात या उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, शहरातील महिला, युवक-युवती आणि लहान मुलांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

रंगताली गरबा उत्सवात विविध वयोगटांतील स्पर्धकांना सहभागी होता यावे, यासाठी ड्युएट गरबा, ८ ते १३ वर्षे वयोगटातील मुलांसाठी किड्स गरबा, कॉमन राऊंड, ४० वर्षांवरील महिलांसाठी विशेष गरबा, ग्रुप गरबा तसेच गरबा क्वीन आणि गरबा किंग अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना आपले नृत्यकौशल्य सादर करण्याची संधी मिळणार असून, आकर्षक सादरीकरणातून विजेतेपद पटकाविण्यासाठी स्पर्धकांमध्ये चुरस पाहायला मिळणार आहे. विशेष म्हणजे, विविध स्पर्धांमधील विजेत्यांना हजारो रुपयांची बक्षिसे देण्यात येणार असल्याने सहभागी स्पर्धकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा आहे. गरबा क्वीन आणि गरबा किंग या स्पर्धांसह लहान मुलांच्या गरबा सादरीकरणाकडेही नागरिकांचे लक्ष लागणार आहे. पारंपरिक गरबा नृत्याच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्यासोबतच महिला आणि बालकांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचा या उत्सवाचा प्रयत्न आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या रंगताली गरबा उत्सवामुळे बल्लारपूर शहरात उत्सवी वातावरण निर्माण होणार आहे. संगीताच्या तालावर गरब्याचा आनंद लुटण्यासोबतच विविध स्पर्धांचा थरार अनुभवण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. शहरातील गरबाप्रेमी, महिला, युवक-युवती आणि पालकांनी आपल्या मुलांसह या उत्सवात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.

## नागपुरात १ नोव्हेंबरला माळी समाजाचा युवक-युवती परिचय व पालक मेळावा

### अखिल भारतीय माळी महासंघ व क्रांती ज्योती माळी विकास संस्थेचा पुढाकार, इच्छुकांनी २० ऑक्टोबरपर्यंत ऑनलाइन नोंदणी करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
माळी समाजातील विवाहयोग्य युवक - युवतींना योग्य जीवनसाथी निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अखिल भारतीय माळी महासंघ व क्रांती ज्योती माळी विकास संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने युवक-युवती परिचय व पालक मेळाव्याचे आयोजन रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे.

हा मेळावा सुभाष रोड, कॉटन मार्केट रोडवरील गीतामंदिर परिसरात आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या परिचय मेळाव्याच्या माध्यमातून विवाहयोग्य युवक-युवतींना एकमेकांची शैक्षणिक, व्यावसायिक व कौटुंबिक पार्श्वभूमी जाणून घेण्याची तसेच परस्परांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर पालकांनाही विवाहासंदर्भात चर्चा करून योग्य स्थळ निवडण्यास मदत होणार आहे. समाजातील विवाहेच्छुक युवक- युवती आणि त्यांच्या पालकांसाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार आहे. या मेळाव्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या युवक- युवतींनी २० ऑक्टोबर २०२६ पर्यंत www.kjmalivikas.com या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करावी. तसेच मेळाव्याच्या लेकमत भवन येथील बी विंगमधील भेलकर कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या कार्यालया द्वारे नोंदणी करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. समाजातील जास्तीत जास्त विवाहयोग्य युवक- युवतींनी आपल्या पालकांसह या परिचय मेळाव्यात सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव वैराळे व सचिव मधुसूदन देशमुख यांनी केले आहे. माळी समाजाचे प्रसिद्धी प्रमुख देवरावजी प्रधान यांनी कळविले आहे.

## चंद्रपुरात एलसीबीचा तंबाखू तस्करांवर छापा : दोघे ताब्यात, १.२३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर -धनंजय पांढरे**
प्रतिबंधित सुगंधी तंबाखूची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी), चंद्रपूरने धडक कारवाई करत दोन आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत तेलंगणा राज्यातून विनापरवाना आणलेला १ लाख २३ हजार ३७५ रुपये किमतीचा प्रतिबंधित सुगंधी तंबाखू आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली मोटारसायकल पोलिसांनी जप्त केली. या कारवाईमुळे अवैध तंबाखू वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



१३ ऑक्टोबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चंद्रपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचण्यात आला. या कारवाईदरम्यान साहिल मंगल वांढे २४ वर्ष रा. बिनबागेट वार्ड, चंद्रपूर आणि वसंत नागोजी नरड ६० वर्ष रा. हनुमान वार्ड, चंद्रपूर या दोघांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून तेलंगणा राज्यातून विनापरवाना आणलेला हुक्का शिशा, ईगल हुक्का शिशा आदी प्रतिबंधित सुगंधी तंबाखू जप्त करण्यात आला. तसेच या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली हिरो मोटारसायकल क्रमांक एमएच ३४ एआर ९९०९ देखील पोलिसांनी जप्त केली. जप्त करण्यात आलेल्या तंबाखूसह मोटारसायकलची एकूण किंमत १ लाख २३ हजार ३७५ रुपये आहे.

या प्रकरणी चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिबंधित तंबाखूची अवैध वाहतूक रोखण्यासाठी पोलिसांकडून करण्यात आलेल्या या कारवाईमुळे अशा गैरप्रकारांत सहभागी असणाऱ्यांना चाप बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात चंद्रपूर उपविभाग पथकाने केली.

## चाचेर - निमखेडा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावा-गावात सेवासंकल्प अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद : संजू वाघमारे

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साह-मौदा**
मौदा तालुक्यातील चाचेर - निमखेडा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावा-गावात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रशासकीय कार्यकीर्दीला पंचवीस पूर्ण झाल्याबद्दल माजी आमदार टेकचंद सावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपा जिल्हा अध्यक्ष आनंदराव राऊत यांच्या नेतृत्वाखाली सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याचे भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा रामटेक ( ग्रामीण) उपाध्यक्ष तथा निमखेडा - चाचेर जिल्हा परिषद सर्कलचे भाजपचे भावी उमेदवार संजू वाघमारे यांनी सांगितले.



वाघमारे यांनी पुढे सांगितले की,चाचेर - निमखेडा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक गावातील अंगणवाडी सेविकांचे सन्मान करणे, अंगणवाडीतील मुलांना खाऊ वाटप, खेळण्याचे साहित्य वाटप करणे हे कार्यक्रम घेण्यात येत आहे. पक्षाने दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे गावात असलेल्या वाचनालयास पुस्तक भेट देणे, वृद्ध व्यक्तीची भेट घेऊन त्यांच्या सोबत स्नेहभोजन करणे, वृक्षारोपण, स्वास्थ कॅम्प भरविणे, आशीवार्दाचा दिवा प्रज्वलित करणे, रक्तदान व आरोग्य शिबीर घेणे, स्वच्छता अभियान या सारखे शिबीर भरवून नागरिकांना मदत करणे असे भरगच्च उपक्रम राबविण्यात येत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनेचा लाभार्थ्यांचे प्रत्यक्ष भेट घेवून सरकारच्या मिळणा-या लाभामध्ये काही अडचणी असल्यास शासन स्तरावर सोडविणे आणि सेवाज्योती यात्रेच्या माध्यमातून देशाबद्दल प्रेम वाढविणे. प्रत्येक धार्मिक मठ, मंदिर, मस्जिद अशा ठिकाणी जाऊन स्वच्छता करणे आदी उपक्रम १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर कालावधीत राबविण्यात येत आहेत.

या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य कैलास बरबटे, चाचेर मंडळ अध्यक्ष रवी चव्हाण, माजी पंचायत समिती उपाध्यक्ष खेमराज चाफले, महामंत्री चाचेर मंडळ कैलास सोमनाथे, मंगेश चाफले, किरण बरबटे, अशोक बावनकुळे, प्रल्हाद रंधाई, लिलाधर घाटबांधे, रजत महादुले, धनराज हरोडे, मोतीराम घरजाळे, कमलेश महादुले, उमेश शेंडे सह चाचेर - निमखेडा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणारे भाजपा व भाजयूमो पदाधिकारी व कार्यकर्तेगण परिश्रम घेत आहेत.

### थोडक्यात

## शेतातील मोटारपंप चोरणारा जाळ्यात!

### कारगाव शिवारातील चोरीचा छडा, दुचाकीसह ९० हजारांचा मुद्देमाल जप्त



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
शेतातील पराटी पिकाला पाणी देण्यासाठी कॅनलवर लावलेला मोटारपंप चोरून नेणाऱ्या आरोपीला भिवापूर पोलिसांनी गजाआड केले. ओमकेश ओमप्रकाश गुडधे (रा. मानोरा) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीचा मोटारपंप, केबल वायर आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कारगाव येथील शेतकरी कृपाकर जागोजी गिरडकू (वय ३५) यांनी ४ ऑक्टोबर रोजी शेतातील पराटी पिकाला पाणी देण्यासाठी कॅनलवर मोटारपंप लावला होता. दिवसभर पाणी दिल्यानंतर सायंकाळी सात वाजता त्यांनी मोटार बंद करून घर गाठले. मात्र, रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने मोटारपंप आणि केबल वायर लंपास केली. परिसरात शोध घेऊनही साहित्य न मिळाल्याने त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. याप्रकरणी भिवापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी ओमकेश गुडधे याची चौकशी केली. त्याने चोरी केल्याची कबुली दिल्यानंतर त्याच्या घरातून नऊ हजार रुपये किमतीचा लक्ष्मी कंपनीचा पाणबुडी मोटारपंप, एक हजार रुपये किमतीची ४५ फूट केबल वायर आणि ८० हजार रुपये किमतीची गुन्ह्यात वापरलेली दुचाकी (एमएच ४० डीडी ०२०७) जप्त करण्यात आली. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी मयंक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार अजितसिंह देवरे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल गेडाम, सहायक फौजदार प्रफुल्ल माहुरे आणि पोलीस शिपाई रवी वानखेडे यांनी केली.

## राजापूरच्या भालावली पिशेदवाडीत १५ फुटी भल्या मोठ्या अजगराचे दर्शन, सर्पमित्रांनी केले सुरक्षित रेस्क्यू!



**दै. सिंहवाणी वृत्त, राजापूर**
रविंद्र जाधव, राजापूर तालुक्यातील भालावली येथील पिशेदवाडी परिसरात सुहास ओणकर यांच्या घराशेजारी तब्बल १५ फुटी भला मोठा अजगर आढळून आल्याने परिसरात चचेर्चे वातावरण निर्माण झाले. या अजगराला सर्पमित्र विवेक घाटे आणि ओमकार घाटे यांनी पकडले. घराशेजारी एवढ्या मोठ्या आकाराचा अजगर आढळल्याने परिसरातील नागरिकांचे लक्ष या घटनेकडे वेधले गेले. अजगर दिसून आल्यानंतर त्याला पकडण्यासाठी सर्पमित्र विवेक घाटे व ओमकार घाटे यांना पाचारण करण्यात आले. दोन्ही सर्पमित्रांनी घटनास्थळी पोहोचून अजगराला पकडले.

अजगरासारखे वन्यजीव मानवी वस्तीजवळ आढळल्यास नागरिकांनी घाबरून न जाता योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. अशा वेळी सर्पाला पकडण्याचा किंवा त्याला इजा पोहोचवण्याचा प्रयत्न न करता प्रशिक्षित सर्पमित्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येते. दरम्यान, भालावली पिशेदवाडी येथे आढळलेल्या या भल्या मोठ्या अजगराची परिसरात चर्चा सुरू आहे.

## "स्वरमेघ आर्ट फाउंडेशन" आणि "स्वप्नगंध" सांगितिक महफिल "बॉलीवूड हिट्स" उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
भारतीय चित्रपटसृष्टीतील अजरामर आणि सदाबहार गीतांना उजाळा देणारी एक भव्य सांगीतिक मैफल 'बॉलीवूड हिट्स'चे आयोजन स्वरमेघ आर्ट फाउंडेशन आणि स्वप्नगंध यांच्या वतीने करण्यात आले . ही सांगीतिक संध्या शुक्रवार, ९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, नागपूर येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाली. बॉलीवूडच्या सुवर्णकाळापासून आजवर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या लोकप्रिय गीतांची सुरेल सफर या कार्यक्रमातून रसिकांना अनुभवता आली .जुन्या आठवणींना उजाळा देतानाच विविध भावछटांनी नटलेल्या सदाबहार गीतांची मेजवानी रसिकांना दिली.

गायक कलाकार स्मिता टोणगावकर, निकेता जोशी, माया सायखेडकर, प्रीती कुलकर्णी, प्रकाश देशपांडे, अजय देशपांडे आणि समीर उपाध्ये यांनी आपल्या दमदार आणि सुरेल सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे संगीत संयोजन परिमल जोशी यांचे होते. वृषाली देशपांडे यांनी कार्यक्रमाचे उत्तम आणि साजेसे असे विवेदन केले. या कार्यक्रमाला रसिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी स्वरमेघ आर्ट फाउंडेशनचे अध्यक्ष मनीष उपाध्ये आणि संस्थेचे पदाधिकारी प्रबोध देशपांडे, दिनेश टेकाडे, राजेश दुर्गे, विशाखा पाध्ये, शर्वरी पुराणिक यांचा स्वप्नगंध तर्फे सन्मान करण्यात आला.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरूवार, १५ ऑक्टोबर २०२६

थोडक्यात

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त वंचित बहुजन आघाडीतर्फे अभिवादन




**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त १४ ऑक्टोबर रोजी वंचित बहुजन आघाडीच्या नागपूर ग्रामीण तालुका कमेटीतर्फे दवलामेटी येथील पक्ष कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करण्यात आले.
यावेळी तालुका कमेटी सचिव विनायकराव धुमटकर यांनी, बौद्ध धम्म हा माणसाने माणुसकीने जगण्याचा मार्ग असल्याचे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष अमन जामगडे होते. संचालन नागेश बोरकर यांनी केले, तर आभार अमन जामगडे यांनी मानले. यावेळी नितीन सव्वासेरे, अरविंद सवाईथुल, प्रकाश मेश्राम, दर्शन बेले यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## ३१ डिसेंबर २०२७ पूर्वी विदर्भ राज्य निर्माण होणारच, 'विराआंस'चा नागपूर बैठकीत निर्धार




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या (विराआंस) वतीने विदर्भ राज्य निर्मितीसाठी आंदोलनाची तीव्रता वाढवण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. ३१ डिसेंबर २०२७ पूर्वी विदर्भाचे स्वतंत्र राज्य निर्माण होणारच, असा ठाम निर्धार समितीने व्यक्त केला आहे. "अभी नही तो कभी नही" या घोषणेसह विदभार्तील ११ जिल्हे आणि १२० तालुक्यांमध्ये तीव्र जनआंदोलन छेडले जाणार आहे. दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी नागपूर येथे विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या कोर कमिटी सदस्य, जिल्हा अध्यक्ष, जिल्हा समन्वयक आणि युवा आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण संयुक्त बैठक पार पडली.
या बैठकीत विदर्भावर होत असलेल्या अन्यायावर तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली आणि "विदर्भाचेस्वतंत्र राज्य" हाच आता एकमेव पर्याय असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या महत्त्वपूर्ण बैठकीला विदर्भ राज्य आंदोलन समितीचे मुख्य नेते आणि प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळ आयोजित भव्य रास गरबा-२०२६

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
चला तर मग, नवरात्रीच्या उत्साहात रंगूया... रास गरब्याच्या तालावर थिरकूया! समाजहित सवोतीपरी जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळातर्फे आयोजित भव्य रास गरबा महोत्सवासाठी समस्त समाज बंधू-भगिनींना व कुटुंबीयांना मनःपूर्वक आमंत्रित करण्यात येत आहे! कार्यक्रमाची खास आकर्षणे महाराष्ट्रातील प्रख्यात सौ. व श्री. सुरभी सचिन ढोमने यांचा वाद्यवृंद संच! रास गरबा` डांडिया फ्युजन` कपल गरबा बॉलीवूड फ्युजन आकर्षक बक्षिसे, लकी ड्रॉ, गुड्स स्टॉल आणि बरंच काही! चविष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद! प्रवेश पूर्णतः निःशुल्क! सर्व समाज बांधवांनी आपले प्रवेश पास आजच जैन कलार समाज भवन, रेशीमबाग, नागपूर येथील कार्यालयातून प्राप्त करून घ्यावेत. कार्यक्रमाचे दिवसः १६, १७ व १८ ऑक्टोबर २०२६ वेळः सायंकाळी ६:३० ते रात्री १०:०० स्थळः जैन कलार समाज भवन, रेशीमबाग, नागपूरचला, आपल्या कुटुंबीयांसह आणि मित्रपरिवारासह सहभागी होऊन या उत्सवाची शोभा वाढवूया! आपल्या समाजातील एकोपा,आनंद आणि संस्कृतीचा सुंदर संगम अनुभवूया! आपली उपस्थिती हीच या सोहळ्याची खरी शोभा! सस्नेह निमंत्रकःजैन कलार समाज मध्यवर्ती मंडळ (केंद्रीय व जिल्हा समिती, नागपूर) रास गरबा २०२६ आनंद, उत्साह आणि एकतेचा जल्लोष!

## ज्येष्ठ मार्गदर्शक मदनराव ठेंगणे यांचा १८ ऑक्टोबरला अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा

### वरोरा येथे स्नेहमेळावा, शिक्षक, विद्यार्थी व हितचिंतकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**
आदर्श शिक्षक, ज्येष्ठ मार्गदर्शक तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक मदनराव विठ्ठलराव ठेंगणे (सेवागंध) यांच्या अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन रविवार, १८ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रात आदर्श शिक्षक व मार्गदर्शक म्हणून ओळख असलेल्या ठेंगणे सरांच्या अमृत महोत्सवी सोहळ्या निमित्त त्यांच्याप्रती आदर, स्नेह आणि कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.



हा सोहळा रविवार, १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता. वरोरा येथील वानखेडे सेलिब्रेशन, वणी बायपास रोड येथे आयोजित करण्यात आला आहे. या मंगलप्रसंगी ठेंगणे यांना अमृत महोत्सवी वर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी तसेच त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि आनंदमय वाटचालीच्या सदिच्छा व्यक्त करण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. आदर्श शिक्षक, ज्येष्ठ मार्गदर्शक आणि सेवानिवृत्त मुख्याध्यापक म्हणून त्यांच्याविषयी असलेला आदरभाव व्यक्त करण्यासाठी हा सोहळा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या अभिष्टचिंतन सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे सस्नेह निमंत्रण देण्यात आले आहे.

# शेगावच्या गजानन महाराज संस्थानला ३.८१ हेक्टर जमिन

### बुलढाण्यातील गिरडा येथे ३ .८१ हेक्टर जमिनीवर बांधकामास मंजुरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा प्रस्ताव मंजूर, राज्य मंत्रिमंडळाचा मंजुरी

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
बुलढाणा जिल्ह्यातील गिरडा येथे श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगाव यांना यात्रास्थळाच्या विकासासाठी ३.८१ हेक्टर शासकीय जमिनीवर कायमस्वरूपी बांधकाम करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.
महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने हा निर्णय झाल्याने गिरडा येथे



स्मृतीकेंद्र, रुग्णालय, निवास संकुलासह विविध सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.
गिरडा येथे वृक्षलागवडीसाठी संस्थानला १९.०६ हेक्टर शासकीय जमीन देण्यात आली होती. या जागेवर स्मृतीकेंद्र, इको टुरिझम सेंटर, शांती कुटीर, निवास संकुल, नॅचरोपथी केंद्र, आयुर्वेदिक संशोधन केंद्र, रुग्णालय आणि ग्रामीण कुटीर



उद्योग सुरू करण्यासाठी सुविधा उभारता येतील. त्यामुळे गिरडा येथे येणाऱ्या भाविकांना निवास, आरोग्यसेवा आणि निसर्गोपचाराच्या सुविधा मिळण्यास मदत होईल.
यापूर्वी या जमिनीवर वृक्षलागवडीसाठी मंजुरी देण्यात आली होती. मात्र, यात्रास्थळाच्या विकासासाठी कायमस्वरूपी बांधकामाची गरज लक्षात घेऊन शासनाने विशेष मंजुरी दिली आहे. यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदी आणि १६ ऑगस्ट १९९० च्या शासन निर्णयातील नियमांबाबत विशेष सूट देण्यात आली आहे. ही परवानगी शासनाने घालून दिलेल्या अटींनुसार असेल.
महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेगाव संस्थानाचे सर्व पदाधिकारी आणि संस्थानाचे अध्यक्ष तसेच त्या भागातील आमदार संजय कुटे यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी यासाठी खूप पाठपुरावा केला होता. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत शेगाव संस्थानाच्या विकासासाठी ३.८१ हेक्टर जागा देण्यात आली आहे. श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगाव हे लाखो भाविकांच्या श्रद्धेचे स्थान आहे. गिरडा येथे स्मृतीकेंद्र, रुग्णालय, आयुर्वेदिक संशोधन केंद्र, नॅचरोपथी केंद्र आणि निवास संकुल यांसारख्या सुविधा उभ्या राहिल्याने भाविकांना मोठा फायदा होईल. या कामांसाठी कायमस्वरूपी बांधकामाची परवानगी मिळावी, यासाठी महसूल विभागाच्या माध्यमातून पुढाकार घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या निर्णयामुळे गिरडा येथील यात्रास्थळाचा विकास होण्यास मदत होईल.

## राष्ट्रीय महामार्ग '३५३ ई'चा कधी संपणार वनवास

### रखडलेले काम, सिमेंट रोडला,भेगा,तडे व खड्यामुळे वाहन चालक त्रस्त, अपघातात अनेकांना गमवावा लागला जीव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे**
वरोरा, चिमुर राष्ट्रीय महामार्ग ३५३ ई अनेक वर्षापासून काम पूर्ण झाल्यामुळे हा रस्ता आजही वनवास भोगतांना दिसुन येत आहे, प्रादेशिक परिवहन विभाग नागरिकांकडून वाहन कर आणि विविध शुल्कांची सक्तीने वसुली करत असताना दुसरीकडे राष्ट्रीय महामार्ग ३५३ ई ची अत्यंत दयनीय अवस्था असून या रस्त्याच्या वनवास कधी संपणार असा प्रश्न जनतेला पडलेला आहे..
या महामार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे, रस्त्याला भेगा, रस्त्याचे अपुरे कामामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सदर महामार्गावरून दररोज शेकडो लहान-मोठी वाहने प्रवास करत असुन रस्त्यावरील खड्डयांमुळे, भेगा, तडे अपुऱ्या बांधकाम कामामुळे अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत असून अनेक वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. विशेषतः नवरात्र, दसरा, दिवाळी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर रात्रीच्या वेळी भेगा, खड्डयांमुळे वाहन चालवताना नियंत्रण बिघडत असल्याने वाहनचालकांना खड्डयांचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.
या महामार्गावर या पूर्वीर्ही अनेक भीषण अपघात झाले असून अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. काही अपघातांमध्ये तर कुटुंबातील कर्त्या व्यक्तींचा मृत्यू झाल्याने संबंधित कुटुंबांवर मोठे संकट कोसळले आहे. तरी देखील संबंधित प्रशासनाकडून या समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.
प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग विभाग यांनी वारंवार होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात कोणतीही ठोस योजना होताना दिसत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.
वाहनधारकांकडून नियमांच्या नावाखाली दंड आणि कर वसूल करणारे प्रशासन नागरिकांच्या सुरक्षेबाबत मात्र उदासीन असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेष म्हणजे प्रादेशिक परिवहन विभाग दैनंदिन रस्ता सुरक्षा अभियान राबवून नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे काम करत असते. हेल्मेट वापरा, सीट बेल्ट लावा, खाजगी वाहन प्रवासी नियंत्रण ठेवणे, वाहतूक नियमांचे पालन करा अशा विविध माध्यमांतून वाहनचालकांना सुरक्षिततेचे धडे दिले जातात, मात्र प्रत्यक्षात रस्ते आणि महामार्गांची अवस्था ठिकठिकाणी अत्यंत बिकट असून प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.
महामार्ग सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पाहता आवश्यक त्या प्रमाणात



कोणतीही प्रभावी सुरक्षा व्यवस्था दिसून येत नाही अनेक ठिकाणी बाबरी रस्त्यावर आलेले असून सूचना फलक नाहीत, रस्त्यावरील रिफ्लेक्टर तुटलेले आहेत, रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्थेचा अभाव आहे तसेच धोकादायक वळणांवरही कोणतीही ठोस खबरदारी घेतलेली दिसत नाही. याचे जिवंत उदाहरण म्हणजे चिमूर-वरोरा राष्ट्रीय महामार्ग ३५३ ई, जिथे दररोज वाहनचालक आपला जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत.
रानतळोधी, सालोरी, खातोडा येथील रंगनाथ महाराज ,व दर्गा परिसरात अर्धवट कामे असून त्या ठिकाणी अपघात घडले आहेत. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असुन प्रशासनाने अद्याप कोणतीही कायमस्वरूपी उपाययोजना केलेली नाही. या भागातून अवजड वाहनांची सतत वाहतूक सुरू असते. परिणामी वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने अपघातांची शक्यता अधिक वाढली आहे.
स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस दुरुस्ती करण्यात आलेली नाही. नागरिकांचा प्रश्न आहे की, वाहनधारकांकडून वेळोवेळी कर व दंड वसूल करणाऱ्या प्रशासनाने रस्त्यांच्या दुरुस्तीकडेही तितकेच गांभीयार्ने लक्ष द्यावे.
वाहनचालकांनी संबंधित विभागाकडे तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करून खड्डेमुक्त महामार्ग करण्याची मागणी केली आहे.

## नागपूरच्या दीक्षाभूमीवर बाबासाहेबांनी केली जगातील ऐतिहासिक धम्मक्रांति : दिगांबर डोंगरे

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**
१४ ऑक्टोबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या करोडो दलीत बांधवांना रक्ताचा एकही थेंबही न सांडवता बौद्ध धम्माची दिक्षा देऊन केलेली धम्म क्रांति ही जगातील पहिली ऐतिहासिक धम्मक्रांति होती. ज्या व्यवस्थेने माणसाला माणसापासून दुर केले अस्पृश्य म्हणून त्यांना मानवी अधिकार नाकारले गुलामीचे जगणे दिले. अन्याय अत्याचार केला अशा करोडो लोकांना बौद्ध धम्माची दिक्षा देऊन स्वतंत्र अस्तित्व निर्माण करून वेगळी ओळख दिली. यामुळेच बौद्ध बांधवांची



शैक्षणिक सामाजिक वैचारिक प्रगती झाली, असे सत्तरव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने आयोजक अभिवादन कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष नगरपरिषदेचे माजी सभापती बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष दिगांबर डोंगरे म्हणाले.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व नगरपरिषद काटोल यांच्यावतीने सत्तरव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी काटोल नगरपरिषदेचे उपाध्यक्ष संदीप वंजारी, बांधकाम सभापती गणेश चन्ने, स्मारक समितीचे अध्यक्ष माजी सभापती दिगांबर डोंगरे, नगरसेविकाप्रज्ञाताई डोंगरे, नगरसेवक सुरेंद्र लोही यांच्या हस्ते माल्यार्पन करून द्वीप प्रज्वलन करून बुद्ध वंदना घेण्यात आली.
यावेळी उपमुख्याधिकारी उमेश हेमांडे, नगरविकास अभियंता प्रभाकर म्हेत्रे, आरोग्य निरिक्षक विजय ठाकरे, अभियंता राजेंद्र काळे, लिपिक राजु सावरकर, अविनाश बरसे,कृष्णा मानकर, मयुर धोंगडी, कैलाश खंते, नामदेव डोंगरे, प्रणय चव्हाण, अनुराग बरसे, कृष्णा माथनकर, अरविंद गजभिये उपस्थित होते.
प्रास्ताविक प्रज्ञाताई डोंगरे यांनी संचालन राजु सावरकर यांनी तर आभार आदित्य भाकरे यांनी मानले.

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त अनुयायांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

### यशोधरा महिला मंडळ व मैत्रीय संघाच्यावतीने अभिवादन

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त वाडीतील स्मृती लेआउट येथील पटांगणात यशोधरा महिला मंडळ व मैत्रीय संघाच्यावतीने अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी



मंडळाच्या अध्यक्षा रंजना सोनडवले, सचीव रत्नमाला साखरकर, अस्मिता मंचाचे अशोक घरडे इ.नी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, तथागत बुद्ध, सम्राट अशोक, सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला माल्यार्पण करून अभिवादन केले.तदनंतर सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली.
यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजकुमार बोरकर यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या धम्मदीक्षेचे ऐतिहासिक वर्णन कथन केले. कार्यक्रमाला यशोधरा महिला मंडळ, मैत्रीय संघाच्या रंजनाताई सोनडवले, रत्नमाला साखरकर, अशोक घरडे, रजनी सहारे, धीरज थुल, रोशनी बन्सोड, बंडू चोखांद्रे, बन्सोड काकू, राजकुमार बोरकर, रजनी बागडे, रंजना सोनडवले इत्यादी सह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होते. संचालन व आभार रजनी बागडे यांनी केले.

## अखेर ऑटोचालकाविरुद्ध विवाहित तरुणीच्या खुनाचा गुन्हा दाखल!

### जलालखेडा पोलिसांची दमदार कामगिरी; तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि कुटुंबीयांच्या माहितीच्या आधारे तपासाला दिशा; आरोपीला १६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील जलालखेडा ते काटोल मार्गावरील नायगाव गावाजवळ गंभीर जखमी अवस्थेत आढळून आलेल्या २४ वर्षीय विवाहित तरुणी शीतल सुभाष चरपे हिच्या मृत्यू प्रकरणाला आता महत्त्वाचे वळण मिळाले आहे. या प्रकरणी जलालखेडा पोलिसांनी ऑटोचालक विकास रमेशराव कांबळे (वय ३५, रा. आमनेर, जि. अमरावती) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ अन्वये खुनाचा गुन्हा



**शीतल चरपे मृत्यू प्रकरणी ऑटोचालक विकास कांबळे**

दाखल केला आहे.
तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती आणि मृत तरुणीच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. न्यायालयाने आरोपीला १६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.
मंगळवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास जलालखेडा ते काटोल मार्गावरील नायगाव गावाजवळ शीतल चरपे ही डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या अवस्थेत आढळून आली होती. तिच्या डोक्याला गंभीर जखम झाली होती, तसेच मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला होता. घटनेची माहिती मिळताच काही युवक आणि पोलिसांनी तिला तातडीने जलालखेडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती.
घटनेची माहिती मिळाल्यानंतर जलालखेडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. सुरुवातीला अपघाताच्या अनुषंगाने तपास सुरू करण्यात आला होता. मात्र, पुढील तपासादरम्यान पोलिसांना मिळालेली गुप्त माहिती, सीसीटीव्ही फुटेजमधून प्राप्त झालेले तांत्रिक पुरावे आणि मृत शीतलच्या कुटुंबीयांनी दिलेली माहिती यामुळे प्रकरणाला वेगळी दिशा मिळाली. त्यानंतर पोलिसांनी ऑटोचालक विकास कांबळे याला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली.
तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी विकास कांबळे याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला १६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली. आरोपीच्या पोलीस कोठडीदरम्यान या प्रकरणातील महत्त्वाचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता आहे. घटना नेमकी कशी घडली, तरुणीच्या मृत्यूमागील कारण काय आणि घटनेच्या वेळी नेमके काय घडले होते, याचा सखोल तपास पोलीस करीत आहेत.
तांत्रिक पुरावे आणि विविध माहितीच्या आधारे तपासाची दिशा निश्चित करत जलालखेडा पोलिसांनी या प्रकरणात खुनाचा गुन्हा दाखल केल्याने तपासाला महत्त्वाचे वळण मिळाले आहे. या प्रकरणातील संपूर्ण सत्य पोलीस तपासातून समोर येणार आहे. या घटनेचा पुढील तपास जलालखेडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार विनोद जांभळे, पोलीस उपनिरीक्षक आकाश महाकाळ आणि माया वैश्य करीत आहेत.

थोडक्यात

## वाचन प्रेरणा दिनानिमित्त आज परिसंवाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ वाचन प्रेरणा दिनानिमित्त आर. एस. मुंडले कला, वाणिज्य महाविद्यालय आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिलांची प्रगती आणि मर्यादा : दोन्ही महिलांमुळेच' या विषयावर गुरुवारी, १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता आर. एस. मुंडले महाविद्यालयाच्या सभागृहात परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी डॉ. मंजुश्री सरदेशपांडे राहणार असून अनघा सराफ, ज्वाला धोटे, कुंदा राऊत आणि रजनी हुद्दा या वक्त्या विषयाच्या विविध पैलूंवर आपले विचार मांडणार आहेत. या परिसंवादाला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पद्माकर देशपांडे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

तात्या टोपे नगर, नागपूर येथील रहिवासी पद्माकर त्र्यंबक देशपांडे (वय ९२) यांचे बुधवार, १४ ऑक्टोबर २०२६ रोजी



वृद्धापकाळाने निधन झाले. ते नवी दिल्ली येथील गृह मंत्रालयातून निवृत्त झाले होते. त्यानंतर त्यांनी इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्र, नवी दिल्ली येथेही काम केले. ते नखांनी चित्रे साकारणारे नेल आर्टिस्ट होते. त्यांच्या पश्चात पत्नी मनीषा, मुलगा निनाद, मुली माधवी बंडे आणि मैथिली तेलंग असा परिवार आहे. त्यांच्यावर १५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सहकारनगर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## रामटेक येथे ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक रामटेक येथे परीवर्तन मंचतर्फे भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरणाकृत पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, परिवर्तन दिन चिराई हो असा जयघोष करण्यात आला. यावेळी संस्कृत विद्यापिठाचे कुलसचिव डॉ.रोशन अलोने, प्रा.राजेंद्र कामळे, राहुल जोहरे, रुस्तम मोटघरे, जिभे, दिपराज भोवते सह आदी उपस्थित होते.

## आईने २० रुपये दिले नाही म्हणून १३ वर्षीय मुलाची गळफास घेऊन आत्महत्या

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

नैतीक संजय दसमेर १३ वर्षीय मुलगा शाळेत जाण्यापूर्वी आईला



२० रुपयांची मागणी करीत होता. आईकडे नसल्याने तुला मजुरीचे पैसे मिळाल्यानंतर देईल, असे म्हटले. परंतु राग मनात ठेवून त्याने शाळेच्या मार्गावरील परिसरात झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना पथरई येथील असून १३ ऑक्टोबरला सकाळी साडेअकरा वाजता उघडकीस आली. मुलाच्या आत्महत्येमुळे समाजमनसुन्न झाले आहे. नैतिक संजय दशमेर असे मृतक मुलाचे नाव असून तो पथरई आंबाझरी येथील नवजीवन हायस्कूलमध्ये आठव्या वर्गात शिकत होता. त्याचे आईवडील मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घरची परिस्थिती बेताची आहे. हातावर आणायचे आणि पानावर खायचे, हा रोजचा संघर्ष आहे. मात्र आपल्या मुलाच्या आयुष्यात असे काही घडेल, याची त्यांना कल्पना नव्हती.

नैतिक हा विश्वनाथ वासनिक यांच्या शेतात मृतावस्थेत आढळल्याची माहिती प्रकाश सोनटक्के यांनी कुटुंबीयांना दिल्यानंतर घटनास्थळी धाव घेतली. देवलापार पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पंचनामा करून मृतदेह ग्रामीण रुग्णालयात हलविला. वडिलांच्या माहितीनुसार, २० रुपये न दिल्याच्या घटनेचा या प्रकाराशी संबंध असावा, असा त्यांचा अंदाज आहे. मात्र नैतिकच्या मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. पुढील तपास देवलापार पोलीस करीत आहेत.

## टीईटी रेंगाळली; उमेदवार संभ्रमात

**पुणे :** शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून परीक्षेची तयारी करणारे हजारो उमेदवार सध्या टीईटीच्या नव्या तारखेच्या प्रतीक्षेत आहेत. परीक्षा पुढे ढकलली, ऑनलाइन की ऑफलाइन याबाबतचा निर्णय अद्याप स्पष्ट नाही आणि परीक्षेचे सुधारित वेळापत्रकही जाहीर झालेले नाही. त्यामुळे अभ्यास करायचा, पुढील नियोजन कसे करायचे आणि परीक्षा नेमकी कधी होणार, असे प्रश्न उमेदवारांसमोर उभे आहेत.

पेपरफुटीच्या प्रकरणानंतर परीक्षेच्या पद्धतीबाबत संभ्रम निर्माण झाला असून शासन आणि परीक्षा परिषदेकडून ठोस निर्णय कधी घेतला जाणार, नीटसारखी राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा महिनाभराच्या कालावधीत घेणे शक्य होते, तर महाराष्ट्रातील टीईटी परीक्षा घेण्यासाठी एवढा विलंब का, असा सवाल उमेदवारांकडून उपस्थित केला जात आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे २१ जून २०२६ रोजी टीईटी परीक्षा घेण्याचे सुरुवातीला नियोजन करण्यात आले होते. त्यानंतर परीक्षेची तारीख बदलून २८ जून करण्यात आली. पेपर फुटल्यानंतर मात्र परीक्षा परिषदेकडून जाहीर प्रकटन प्रसिद्ध करून परीक्षा पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर ऑक्टोबर महिना उजाडला असला तरी नवी तारीख जाहीर झालेली नाही. त्यामुळे परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांना अनिश्चिततेचा सामना करावा लागत आहे.

# अभिजित वंजारी यांच्या विजयासाठी काँग्रेस एकवटली!

### आज नागपुरात कार्यकर्ता मेळावा, प्रदेश प्रभारी सिरीवेल्ला प्रसाद, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची प्रमुख उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे काँग्रेस, महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अँड. अभिजित वंजारी यांच्या विजयासाठी काँग्रेसने पूर्व विदर्भात कंबर कसली आहे. नागपूर विभागातील पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने संघटनात्मक पातळीवर मोचेर्बांधणी सुरू केली असून, उद्या गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी नागपुरात आयोजित कार्यकर्ता मेळाव्याच्या निमित्ताने पक्षाची एकजूट आणि ताकद दाखविण्याची तयारी सुरू आहे. सकाळी ११ वाजता दत्तात्रयनगर येथील महाकाळकर सभागृहात हा मेळावा होणार आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी सिरीवेल्ला प्रसाद आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे स्वतः उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार असल्याने या मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

नागपूरसह वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या सहाही जिल्ह्यांतील काँग्रेसचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, माजी लोकप्रतिनिधी, विविध आघाड्या व संघटनांचे पदाधिकारी या मेळाव्याच्या निमित्ताने एकाच मंचावर येणार आहेत. पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीसाठी पक्षाची रणनीती, प्रचाराचे नियोजन आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने या मेळाव्यातून कार्यकर्त्यांना दिशा दिली जाणार आहे. प्रदेशातील प्रमुख नेते स्वतः प्रचाराच्या मैदानात उतरत असल्याने कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**विरोधकांच्या आरोपांना एकजुटीतून उत्तर?**

काँग्रेसमध्ये एकजूट नसल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जात असला, तरी पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेसने संघटनात्मक ताकद पणाला लावली आहे. सहाही जिल्ह्यांतील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते आपापल्या भागात स्वतंत्रपणे प्रचाराची धुरा सांभाळत आहेत. स्थानिक पातळीवर मतदारांशी संपर्क, बैठका, संघटनात्मक समन्वय आणि प्रचाराच्या माध्यमातून उमेदवाराच्या बाजूने वातावरणनिर्मिती करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे उद्याचा मेळावा हा केवळ कार्यकर्त्यांचा संवाद न राहता काँग्रेसच्या संघटनात्मक शक्तीचे प्रदर्शन



ठरण्याची शक्यता आहे.

प्रदेश प्रभारी सिरीवेल्ला प्रसाद आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या मेळाव्यातून पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पक्षाची भूमिका अधिक ठामपणे मांडली जाणार आहे. अभिजित वंजारी यांच्या प्रचाराला गती देणे, पदवीधर मतदारांपर्यंत पक्षाचा जाहीरनामा पोहोचविणे आणि सहाही जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे, या दृष्टीने या मेळाव्याकडे पाहिले जात आहे.

**सहाही जिल्ह्यांत नेत्यांनी सांभाळली प्रचाराची धुरा**

पूर्व विदर्भातील सहाही जिल्ह्यांत काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी प्रचाराची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली आहे. वर्धा जिल्ह्यात माजी मंत्री रणजित कांबळे, चंद्रपूर जिल्ह्यात खासदार प्रतिभाताई धानोरकर, विधानसभेतील काँग्रेसचे गटनेते तथा ब्रह्मपुरीचे आमदार विजय वडेट्टीवार आणि शिक्षक आमदार सुधाकर अडबाले प्रचारात सक्रिय आहेत. गडचिरोली-चिमूरचे खासदार डॉ. नामदेव किरसान हेही गडचिरोली जिल्ह्यात पक्षाच्या प्रचारासाठी प्रयत्नशील आहेत.

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांत काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, गोंदियाचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल आणि दिलीप बन्सोड यांच्यासह स्थानिक पदाधिकारी प्रचाराची जबाबदारी सांभाळत आहेत. नागपूर जिल्ह्यात आमदार विकास ठाकरे, माजी मंत्री सुनील केदार, डॉ. नितीन राऊत, राजेंद्र मुळक, सतीश चतुर्वेदी, शहर काँग्रेस अध्यक्ष प्रफुल्ल गुडधे आणि जिल्हाध्यक्ष अश्विन बैस यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी कामाला लागले आहेत.

काँग्रेसशी संबंधित विविध संघटनांचे पदाधिकारी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, एनएसयूआय तसेच शिक्षक आणि पदवीधर संघटनांच्या माध्यमातूनही संपर्क मोहीम राबविण्यात येत आहे. प्रत्येक जिल्ह्यातील स्थानिक नेतृत्वाने आपापल्या पातळीवर प्रचाराची आखणी केली असून, या प्रयत्नांना एकत्रित दिशा देण्याचे काम उद्याच्या मेळाव्यातून होण्याची अपेक्षा आहे.

**पदवीधरांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित**

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत रोजगार, शिक्षण, स्पर्धा परीक्षा, युवकांच्या संधी आणि शिक्षक-पदवीधरांच्या विविध प्रश्नांना महत्त्व असते. या मुद्द्यांवर पक्षाची भूमिका मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी काँग्रेसकडून प्रयत्न केले जात आहेत. मागील सहा वर्षांत अभिजित वंजारी यांनी केलेल्या कामांची माहिती देण्यासोबतच आगामी काळातील व्हिजन आणि मिशन मतदारांसमोर मांडण्यावर भर दिला जात आहे. उद्याच्या मेळाव्यात प्रदेशातील प्रमुख नेत्यांकडून कार्यकर्त्यांना प्रचाराबाबत मार्गदर्शन केले जाणार असल्याने सहाही जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. काँग्रेसची संघटनात्मक ताकद, स्थानिक नेतृत्वाचा जनसंपर्क आणि पदवीधरांच्या प्रश्नांवर केंद्रित प्रचार या तीन बाबींच्या बळावर अभिजित वंजारी यांच्या विजयासाठी पक्षाने एकत्रित प्रयत्न सुरू केले आहेत.

**संस्था, संघटना आणि पदवीधर मतदारांशी संपर्कावर भर**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार अभिजित वंजारी यांचा सहाही जिल्ह्यांत जनसंपर्क सुरू आहे. नागपुरात त्यांनी विविध संस्था आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन संवाद साधला. या भेटींमध्ये संस्थाचालकांनी त्यांना पाठिंबा देण्याची आणि मोठ्या संख्येने मते मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही दिल्याचे सांगण्यात आले.

नागपूर व्यतिरिक्त वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या पाच जिल्ह्यांतही शिक्षक संघटना, पदवीधर संघटना आणि महिला संघटनांच्या माध्यमातून जनसंपर्क वाढविण्यावर भर दिला जात आहे. विविध संघटनांशी संवाद, स्थानिक प्रश्नांची जाण आणि मतदारांशी थेट संपर्क या बाबी अभिजित वंजारी यांच्या प्रचारासाठी महत्त्वाच्या ठरू शकतात. उद्याच्या कार्यकर्ता मेळाव्यातून या संपर्क मोहिमेला अधिक गती मिळण्याची अपेक्षा आहे.

## बेलगाव रिठ परिसरात वनराई बंधाऱ्याची उभारणी

### पाणी फाउंडेशनच्या फार्मर कप स्पर्धे अंतर्गत जलसंधारणचा उपक्रम, दुर्गा महिला शेतकरी गट किन्हाळा यांचा उपक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे**

शेगाव येथून जवळच येत असलेल्या किन्हाळा येथील दुर्गा महिला शेतकरी बचत गट कडून सुरू असलेल्या पाणी फाउंडेशनचा फार्मर कप स्पर्धा २०२६ अंतर्गत तसेच सगळीकडे सुरू असलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी टंचाई, शेती पिके निवारणासाठी बेलगाव रिठ शेती परिसरातील नाल्यावर श्रमदानातून वनराई बंधारा बांधकाम करण्यात आले.

या उपक्रमात उपविभागीय कृषी अधिकारी कविता हरणखेडे, तालुका कृषी अधिकारी सुशील आडे, यांच्या मार्गदर्शनातुन वनराई बंधारा बांधकाम उपक्रम राबवत गटातील सर्व शेतकरी महिला सदस्यांनी एकत्र येत उत्स्फूर्त सहभाग दर्शविला असुन या श्रमदानातून परिसरात पाणी संवर्धन, दुष्काळ परिस्थिती, उन्हाळ्यात ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, भूजल पातळीत वाढ यावर नियंत्रण मिळवण्यास मदत होणार आहे.

या वेळी कृषी सहाय्यक कपिल शंखपाडे, माजी उपसरपंच रमाकांत सावसाकडे, अस्मिता गजभे, नीलिमा गजभे, शुभांगी दडमल, निशा मगरे,नंदा गजभे, सविता दडमल,मंदा मगरे, सुमित्रा सावसाकडे, वेनू दडमल, मीरा वाकडे, मंजुषा गजभे, प्रभा मगरे,दशरथ पोहीनकर, महेश गजभे, रवींद्र गजभे, कमलाकर गजभे, आदी उपस्थित होते.

## जांभळी येथील रानडुक्कर पकडणारा आरोपी अखेर अटकेत

### वनपरिक्षेत्राधिकाऱ्यांनी केली कारवाई, दोन आरोपींना घेतले ताब्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

गोंदिया वन विभाग कार्यालय गोंदिया अंतर्गत वनपरिक्षेत्राधिकारी प्रादेशिक सालेकसा क्षेत्र सहाय्यक सालेकसामार्फत १२ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी चार वाजता दरम्यान गुप्त माहितीचे आधारे सालेकसा येथील पुरुषोत्तम सुरेश भांडारकर यांच्या मालकीचे रतन अंडा सेंटर अँड कोल्ड्रिक्स येथे वनरक्षक के. आर फुंडे व इतर कर्मचारी यांनी सदर दुकानाची चौकशी केली असता दुकानातील फ्रीजमध्ये कच्चे डुकराचे मांस दहा पाली तीन पिशवीत मिळाले. यात अधिक चौकशी केली असता सदर मास वन्य प्राणी रानडुकराची असून राजेंद्र टेकचंद ढेकवार रा. जांभळी यांनी आणून दिल्याचे पुरुषोत्तम सुरेश भांडारकर यांनी सांगितले. त्यानुसार बीट वनरक्षकांनी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ नुसार विविध कलम अनन्वये वन गुन्हा क्रमांक ०४५००/ ११२४९६/ ०६२०२६ दिनांक १२.१०.२०२६ अनन्वये वनगुन्हा नोंदविला व आरोपी क्रमांक एक पुरुषोत्तम सुरेश भांडारकर राहणार सालेकसा आमगाव खुर्द व आरोपी क्रमांक दोन राजेंद्र टेकचंद ढेकवार राहणार जाभळी यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. पुढील तपास उपवन संरक्षण सहाय्यक वनसंरक्षण वन विभाग गोंदिया यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सालेकशाचे वनपरिक्षेत्राधिकारी ए. बि वाळके चौकशी करीत आहेत.

प्राप्त माहितीनुसार १३ ऑक्टोंबर रोजी दोन्ही आरोपींना न्यायालय आमगाव येथे हजर करणार आहेत. यात न्यायदंडाधिकारी काय निर्णय घेतात हे अजूनही सांगता येत नाही. यामध्ये कसून चौकशी केली तर नक्कीच अधिक आरोपी मध्ये वाढ होण्याची दाट शक्यता आहे.

## १० लाख क्विंटल कांदा एनसीसीएफच्या गोदामात सडवला?

**नाशिक :** दर नियंत्रणासाठी केंद्रीय ग्राहक मंत्रालयासाठी नाफेड, एनसीसीएफने खरेदी केलेला ९.६० लाख क्विंटल कांदा नाशिकमध्ये सडला आहे. उत्कृष्ट दर्जाच्या २३ रुपये प्रतिकिलो या भावाने ११.९० लाख क्विंटलची खरेदी दाखवली होती. एनसीसीएफचा बारा हजार मेट्रिक टन कांदा बाजारपेठेत पोहोचू शकला. सडलेला कांदा खत म्हणून विक्रीस काढला आहे. किलोला दोन ते चार रुपये भाव मिळू शकतो. कांदा खरेदीतील या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी २९ सप्टेंबरला पणन खात्याने जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीने चौकशी सुरू केली. या समितीचे सदस्य असलेले प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना २६ ऑक्टोबरपर्यंत सर्व खरेदी केंद्रे आणि वखार महामंडळाच्या गोदामांना प्रत्यक्ष भेटी देऊन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथील नाफेडच्या गोदामात सडलेला आणि पूर्णपणे काळा पडलेला कांदा. तळाच्या साठ्याला पाणी सुटल्यामुळे त्याची अस दुर्गंधीही या चाळीत पसरलेली होती. या कांद्यासाठी ठेकेदार संस्थांनी उत्कृष्ट कांद्याचा २३ रुपये प्रतिकिलो भाव मोजला.

## चोरबाहुलीतील नेत्र तपासणी शिबिरातील १९३ नागरिकांना पुढील उपचारांची सुविधा, ९ नागरिक नागपूरला रवाना

### वनसंवर्धनासोबत नागरिकांच्या आरोग्याची काळजी, माधव नेत्रालयाचे मोलाचे सहकार्य

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**




वन्यजीव संवर्धनासोबतच स्थानिक नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने पेंच व्याघ्र प्रकल्प, महाराष्ट्र यांच्या पुढाकारातून सामाजिक बांधिलकीचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहे. चोरबाहुली येथे आयोजित नेत्र तपासणी शिबिरातील १९३ नागरिकांना पुढील तपासणी व उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, या उपक्रमांतर्गत बुधवारी बोरडा व चोरबाहुली येथील ९ नागरिकांना पुढील उपचारांसाठी नागपूर येथील माधव नेत्रालयात पाठविण्यात आले.

दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी चोरबाहुली येथे आयोजित नेत्र तपासणी शिबिरात एकूण ३७५ नागरिकांची प्राथमिक नेत्र तपासणी करण्यात आली होती. यावेळी १९३ नागरिकांमध्ये डोळ्यांशी संबंधित समस्या आढळून आल्याने त्यांच्या पुढील तपासणी व उपचारांसाठी नोंदणी करण्यात आली. या नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य उपचार मिळावेत, यासाठी माधव नेत्रालय, नागपूर यांच्या सहकार्याने पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

या उपक्रमांतर्गत दि. १४ ऑक्टोबर रोजी बोरडा व चोरबाहुली येथील ९ नागरिकांना पुढील नेत्र तपासणी व आवश्यक उपचारांसाठी नागपूर येथे पाठविण्यात आले. उर्वरित नागरिकांनाही टप्प्याटप्प्याने पुढील तपासणी व उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ग्रामीण व वनालगतच्या भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

पेंच व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठानमार्फत राबविण्यात येणारा हा उपक्रम क्षेत्र संचालक एस. रमेश कुमार, उपसंचालक अक्षय गजभिये आणि सहाय्यक वनसंरक्षक कु. पूजा लिमगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

या उपक्रमासाठी माधव नेत्रालय, नागपूर यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. माधव नेत्रालयाचे संचालक गोखले सर आणि प्रशासकीय अधिकारी कुंभारे सर यांनी नागरिकांच्या पुढील नेत्र तपासणी व उपचारांसाठी आवश्यक सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे स्थानिक नागरिकांना तज्ज्ञांकडून पुढील उपचार मिळवून देण्याच्या प्रक्रियेला मदत होत आहे.

थोडक्यात

## आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नांना यश; गोंदिया जिल्ह्यातील उर्वरित ७ तालुक्यांचाही दुष्काळग्रस्त यादीत समावेश

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली होती तातडीने दखल; राज्यातील ३०५ तालुक्यांसाठी मदत उपाययोजनांची तरतूद

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-प्रकाश टेंभरे**

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र शासनाने १४ ऑक्टोबर



२०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयात राज्यातील ३०५ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्याचा यापूर्वीच दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यात आला होता. आता गोंदिया, आमगाव, देवरी, सालेकसा, अर्जुनी मोरगाव, सडक अजुर्नी आणि गोरेगाव या उर्वरित सात तालुक्यांचाही या यादीत समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, आमदार विनोद अग्रवाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन गोंदिया जिल्ह्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करावेत आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी केली होती. या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तपासणी करण्याचे निर्देश दिले होते.

शासन निर्णयानुसार, प्रभावित भागांमध्ये महसूल वसुलीत सवलत, पीककर्ज वसुलीत सवलत, कृषीपंपांच्या वीजबिलात सूट, विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्कमाफी, रोजगार हमी योजनेंतर्गत कामांची उपलब्धता तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा विविध उपाययोजनांची तरतूद करण्यात आली आहे. यासोबतच जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पीक नुकसानीचे पंचनामे करून संपूर्ण प्रस्ताव कृषी विभागामार्फत शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आता या मदत उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होऊन पात्र शेतकरी व लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचण्याची प्रतीक्षा आहे.

## गडमी येथे १४ वर्षीय मुलीचा मृत्यू, खापा पोलिसांकडून तपास सुरू

### सावनेर तालुक्यातील घटना, हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमकडून मदतकार्य



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर तालुक्यातील गडमी येथे १४ वर्षीय मुलीचा राहत्या घरी गळफास घेतलेल्या अवस्थेत मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी, दि. १४ ऑक्टोबर रोजी दुपारी अंदाजे १२.३० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लावण्या विठ्ठल गोळंगे (वय १४, रा. गडमी, ता. सावनेर, जि. नागपूर) हिच्या मृत्यूची माहिती खापा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे यांना गावकरी यांनी दिली तात्काळ सामाजिक कार्यकर्ते हितेश दादा बनसोड पोलिसांनी माहिती दिली.

माहिती मिळताच हितेश दादा बनसोड यांच्या हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमने तत्परतेने मदतकार्य केले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह सावनेर येथील शासकीय रुग्णालयात आणण्यात आला. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून मुलीला मृत घोषित केले. अल्पवयीन मुलीच्या मृत्यूमागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. तिने हे टोकाचे पाऊल का उचलले, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. या प्रकरणाचा तपास खापा पोलीस करीत असून, तपासानंतरच घटनेमागील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. या दुर्दैवी घटनेमुळे गडमी परिसरात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

## उमरेडमध्ये श्री बिमलादेवीचा नवरात्रोत्सव भक्तिभावाने साजरा

### सार्वजनिक बाल दुर्गा उत्सव मंडळाचा ५५ वा उत्सव; अण्णाभाऊ साठे नगरातील मंडळात भाविकांची श्रद्धा



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड शहरातील अण्णाभाऊ साठे नगर येथील सार्वजनिक बाल दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने श्री बिमला देवीची स्थापना करण्यात आली असून उत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो आहे. मंडळाच्या यंदाच्या उत्सवाचे हे ५५ वे वर्ष असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष क्रिष्णा शिवरकर यांनी दिली आहे. देवीचे आकर्षक मंदिर, मनमोहक मूर्ती आणि धार्मिक वातावरण यामुळे परिसरातील भाविकांच्या मनात या देवस्थानाविषयी विशेष श्रद्धा आहे.

**श्री बिमला देवीचे धार्मिक महत्त्व**

हिंदू धर्मपरंपरेत देवी बिमला देवीला आदिशक्तीचे स्वरूप मानले जाते. ओडिशा राज्यातील जगन्नाथपुरी येथील श्री जगन्नाथ मंदिर परिसरात बिमला देवीचे प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. धार्मिक मान्यतेनुसार, देवी बिमला देवी ही जगन्नाथपुरीची अधिष्ठात्री देवी असून, तिची पूजा विशेष महत्त्वाची मानली जाते.

**भक्ती, श्रद्धा आणि परंपरेचा संगम**

उमरेडमधील अण्णाभाऊ साठे नगर येथील सार्वजनिक बाल दुर्गा उत्सव मंडळाच्या तयार केलेल्या मंदिराच्या कलाकृती मध्ये श्री बिमला देवीची आकर्षक मूर्ती स्थापन केली आहे. देवीची सजावट, फुलांची आरास आणि धार्मिक वातावरण भाविकांचे लक्ष वेधून घेतात. नवरात्रोत्सवाच्या काळात देवीची पूजा-अर्चा, आरती आणि दर्शनासाठी भाविकांची मोठी उपस्थिती असते. धार्मिक उत्सव हे केवळ पूजाअर्चेपुरते मर्यादित नसून, समाजातील एकोपा, परस्पर सहकार्य आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याचे माध्यमही आहेत.

# विद्यासागर कला महाविद्यालयात मराठी अभ्यास मंडळाचे उद्घाटन

### दोन कवींच्या प्रकट मुलाखतीने रंगला साहित्यिक सोहळा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

विद्यासागर शिक्षण संस्था, रामटेकद्वारा संचालित विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाडा), रामटेक येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. गिरीश सपाटे, प्रा. गंगा मोंढे आणि पदवी व पदव्युत्तर मराठी विभागाच्यावतीने सोमवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ रोजी मराठी अभ्यास मंडळाचे उद्घाटन आणि 'प्रकट मुलाखत दोन कवींची' हा साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयातील स्व. डॉ. विनोदकुमार जयस्वाल सभागृहात दुपारी १२ वाजता हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर होते. प्रमुख साहित्यिक म्हणून प्रसिद्ध कवी, कथाकार व रेखाचित्रकार प्रमोदकुमार अणेराव आणि सुप्रसिद्ध गझलकार व संपादक विवेक कापगते उपस्थित होते. प्रा. डॉ. सावन धर्मपुरीवार यांनी मुलाखतकार म्हणून दोन्ही कवींशी संवाद साधला. या प्रकट मुलाखतीतून कवींच्या साहित्यिक प्रवासातील अनुभव, साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा, लेखनप्रक्रिया आणि त्यांच्या साहित्यविषयक भूमिका उलगडल्या.

यावेळी अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात साहित्याचे महत्त्व अधोरेखित केले. साहित्याच्या वाचनातून विद्यार्थ्यांची विचारशक्ती, संवेदनशीलता आणि अभिव्यक्ती समृद्ध होते. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता विविध साहित्यप्रकारांचे वाचन करावे आणि साहित्यिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. गिरीश सपाटे यांनी मराठी अभ्यास मंडळाच्या स्थापनेमागील भूमिका स्पष्ट केली. मराठी अभ्यास मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविणे, साहित्याची अभिरुची वाढविणे आणि सर्जनशील लेखनाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. अशा साहित्यिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष साहित्यिकांशी संवाद साधता येतो आणि त्यांच्या साहित्यिक जाणिवांना नवी दिशा मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

प्रकट मुलाखतीदरम्यान कवी प्रमोदकुमार अणेराव यांनी आपल्या साहित्यिक वाटचालीतील अनुभव सांगितले. कविता आणि कथालेखन ही केवळ भावनांची अभिव्यक्ती नसून सभोवतालच्या जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण आणि अनुभवांचे सर्जनशील रूपांतर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. साहित्यनिर्मितीसाठी जीवनाकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि सातत्याने वाचन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. गझलकार विवेक कापगते यांनी गझललेखन, साहित्यवाचन आणि संपादनाच्या अनुभवांवर प्रकाश टाकला. गझलेच्या आशयाबरोबरच तिची भाषा, शब्दांची नेमकी निवड आणि अभिव्यक्तीतील प्रभावीपणा महत्त्वाचा असतो, असे त्यांनी नमूद केले. नव्या पिढीतील विद्यार्थ्यांनी साहित्याचे नियमित वाचन करावे, स्वतःच्या अनुभवांना लेखनातून व्यक्त करावे आणि लेखनात सातत्य राखावे, असे आवाहनही त्यांनी केले.

याप्रसंगी मराठी अभ्यास मंडळाच्या नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन करून तिचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मंडळाच्या माध्यमातून विविध साहित्यिक उपक्रम राबवावेत आणि महाविद्यालयात साहित्यविषयक वातावरण निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

दोन्ही कवींकडून महाविद्यालयाला ग्रंथभेट देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मराठी साहित्य, काव्यलेखन आणि साहित्यिकांच्या अनुभवांविषयी जाणून घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गंगा मोंढे यांनी केले, तर पदव्युत्तर विभागातील विद्यार्थिनी कु. अश्विनी मदनकर हिने आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ.ज्योती कवठे, डॉ.रवींद्र पानतावणे, डॉ.सतीश महल्ले, डॉ.आशिष ठाणेकर, डॉ.विलास जायभाये, प्रा.रणजीत वायसे, कीर्ती जयस्वाल आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## चोरबाहुली शिवारात २३ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या, दोन आरोपी अटकेत

### सावनेरहून गावी सोडण्याच्या बहाण्याने नेले, महामार्गालगत मृतदेह फेकल्याचा आरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

नागपूर जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. सावनेरहून मध्य प्रदेशातील आपल्या गावी जाणाऱ्या २३ वर्षीय तरुणाची हत्या करून त्याचा मृतदेह राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ लगत फेकून दिल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरबाहुली शिवारात हा मृतदेह आढळून आला असून, या प्रकरणी दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. शिवकुमार सोनेश्वर असे मृत तरुणाचे नाव असून सावनेरहून गावी सोडून देण्याच्या बहाण्याने सोबत नेले आणि वाटेतच तरुणाची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

शिवकुमार अनिलकुमार सोनेश्वर, वय २३, हा मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यातील पारसवानी येथील रहिवासी होता. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी त्याने अन्य दोन व्यक्तींसोबत मोटारसायकलवरून प्रवास करत असल्याचे छायाचित्र आपल्या कुटुंबीयांना पाठविले होते. मात्र, तो घरी परतला नाही. त्यामुळे त्याचा भाऊ जयकुमार सोनेश्वर याने ११ ऑक्टोबर रोजी सावनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.



पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत छायाचित्रातील व्यक्तींची चौकशी केली. या तपासादरम्यान आकाश गुणवंता धुर्वे, वय २८, आणि विलास मधुकर इनवाते, वय २८, दोघेही रा. कोथुळणा, ता. सावनेर, जि. नागपूर, यांची नावे समोर आली.

पोलिसांच्या माहितीनुसार, शिवकुमारला गावी सोडण्याचे सांगून तिघेही सावनेरहून मनसरमार्गे सिवनीच्या दिशेने निघाले होते. प्रवासादरम्यान रात्री दहाच्या ते अकराच्या सुमारास रस्त्याच्या कडेला थांबल्यानंतर शिवकुमार आणि दोन्ही आरोपींमध्ये वाद झाला. त्यानंतर दोघांनी त्याला मारहाण करून डोक्यावर दगड मारल्याने त्याचा मृत्यू झाल्याची माहिती तपासात समोर आली आहे. त्यानंतर मृतदेह रस्त्यालगत फेकून आरोपी निघून गेल्याचे पोलिसांनी सांगितले.

या माहितीच्या आधारे १२ ऑक्टोबर रोजी पोलिसांनी आरोपींना सोबत घेऊन चोरबाहुली शिवारातील घटनास्थळी तपास केला. यावेळी मृतदेह आढळून आला. शिवकुमारचा भाऊ जयकुमार याने मृतदेहाची ओळख पटविली. घटनास्थळ देवलापार पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नागपूर येथील मेडिकल हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आला.

या प्रकरणी देवलापार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५३८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) आणि ३(५) अंतर्गत दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघांनाही अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून, त्यांचा रिमांड घेण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली देवलापार पोलीस करीत आहेत.

## हिंगोलीत तहसील कार्यालयासमोर नोटांची उधळण

**हिंगोली :** राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असताना सरकारने जाहीर केलेल्या ५ हजार रुपयांच्या अग्रीम मदतीवरून आता संताप व्यक्त होत आहे. हिंगोली जिल्ह्यातील गोरेगाव येथील अप्पर तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी या मदतीच्या रकमेची उधळण करत सरकारविरोधात घोषणा दिल्या.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सरकारने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत ५ हजार रुपयांची अग्रीम मदत जमा करण्याची घोषणा केली आहे. मात्र, या मदतीवरून शेतकरी संघटनांसह विरोधी पक्षातील नेत्यांनीही सरकारला लक्ष्य केले आहे. दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असताना जाहीर केलेली मदत शेतीचा खर्च भागवण्यासाठीही अपुरी असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. हिंगोलीतील गोरेगाव येथे शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून नाराजी व्यक्त केल्याने या मुद्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई आणि वाढता उत्पादन खर्च अशा अनेक समस्यांचा सामना शेतक-यांना करावा लागत आहे. बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरी यांसाठी मोठा खर्च करावा लागतो. त्यात पावसाअभावी किंवा प्रतिकूल हवामानामुळे उत्पादन घटल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडते. अशा परिस्थितीत सरकारकडून मिळणारी मदत नुकसानाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. याच नाराजीतून गोरेगाव येथील अप्पर तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी ५ हजार रुपयांच्या नोटा उधळून निषेध नोंदवला. सरकारने दिलेली मदत स्वीकारण्यापेक्षा शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीच्या प्रमाणात आर्थिक सहाय्य मिळणे आवश्यक असल्याचा संदेश या आंदोलनातून देण्यात आला.

## हलक्या धानाच्या दरात प्रतिक्विंटल २०० रुपयांची घसरण!

### शासकीय धान खरेदी केंद्रे सुरू न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली, खासगी व्यापाऱ्यांना कमी दरात धान विकण्याची वेळ

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

गोंदिया जिल्ह्यात खरीप हंगामातील धान कापणी आणि मळणीच्या कामाला सुरुवात झाली आहे. शेतकरी मेहनतीने पिकवलेले धान विक्रीसाठी बाजारात आणत आहेत. मात्र, अद्याप शासकीय धान खरेदी केंद्रे सुरू झाली नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यातच मागील वर्षाच्या तुलनेत यंदा हलक्या धानाच्या दरात प्रतिक्विंटल सुमारे २०० रुपयांची घसरण झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक चिंता अधिकच वाढली आहे.

**मागील वर्षी २,२०० रुपये, यंदा केवळ २,००० रुपये प्रतिक्विंटल!**

मागील वर्षी शेतकऱ्यांना हलक्या धानाला प्रतिक्विंटल सुमारे २,२०० रुपये भाव मिळत होता. मात्र, यंदा हाच भाव सुमारे २,००० रुपयांपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना



प्रतिक्विंटल २०० रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे.

आधीच शेतीचा वाढता खर्च, खते, बियाणे, मजुरी आणि इतर कृषी खर्चांमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. त्यातच धानाच्या दरात झालेल्या घसरणीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे.

**शासकीय धान खरेदी केंद्रे सुरू होण्याची प्रतीक्षा**

गोंदिया जिल्ह्यात साधारणतः ऑक्टोबर महिन्यापासून शासकीय धान खरेदी केंद्रे सुरू होतात. जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांकडून धानाची खरेदी केली जाते.

जिल्ह्यात जिल्हा मार्केटिंग फेडरेशनची १९४, तर आदिवासी विकास महामंडळाची ४५ खरेदी केंद्रे आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी केली जाते.

मात्र, यंदा अद्याप शासकीय खरेदी केंद्रे सुरू करण्याचे आदेश जारी झालेले नसल्याने शेतकऱ्यांना आपल्या धानाच्या विक्रीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. परिणामी, अनेक शेतकऱ्यांना नाइलाजाने खासगी व्यापाऱ्यांना कमी दरात धान विकावे लागत आहे.

**दिवाळीपूर्वी धान विकण्याची शेतकऱ्यांवर वेळ**

अनेक शेतकरी दिवाळीपूर्वी धानाची कापणी आणि मळणी पूर्ण करून धान विक्रीस काढतात. सणाचा खर्च भागविण्यासोबतच शेतीसाठी घेतलेले कर्ज आणि इतर देणी फेडण्यासाठी शेतकऱ्यांना पैशांची गरज असते.

मात्र, शासकीय धान खरेदी केंद्रे सुरू न झाल्यामुळे शेतकऱ्यांना आपले धान कमी दरात विकण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. शासकीय खरेदी वेळेत सुरू झाली नाही, तर शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागू शकते.

**ई-पीक नोंदणीची समस्याही शेतकऱ्यांसमोर**

शासकीय धान खरेदीचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना सातबारा (७/१२) उताऱ्यावरील ई-पीक पाहणीची अचूक नोंदणी करणे आवश्यक आहे. जमिनीच्या अभिलेखात पिकाची माहिती नोंदविलेली नसल्यास खरेदी केंद्रावर धान स्वीकारण्यात अडचणी येऊ शकतात.

याशिवाय, धान विक्रीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांचे बँक खाते नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया प्रणालीशी जोडलेले असणे आवश्यक आहे. नोंदणी प्रक्रिया आणि इतर प्रशासकीय औपचारिकतां बाबतही शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

**हवामानाच्या फटक्याने धान पिकावरही परिणाम**

यंदा पावसाची कमतरता तसेच कीड-रोगांच्या प्रादुर्भावामुळे धान पिकावर परिणाम झाल्याचे समोर येत आहे. त्यामुळे उत्पादन आणि धानाच्या गुणवत्तेबाबत शेतकरी चिंतेत आहेत. अशा परिस्थितीत बाजारात कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

**शेतकऱ्यांची मागणी : शासकीय धान खरेदी केंद्रे तातडीने सुरू करा!**

धान कापणी आणि मळणीला सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांना आपले धान विकण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे शासन आणि प्रशासनाने तातडीने शासकीय धान खरेदी केंद्रे सुरू करण्याचे आदेश जारी करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

शासकीय खरेदी वेळेत सुरु झाल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या धानाला योग्य भाव मिळण्यास मदत होईल आणि खासगी व्यापाऱ्यांवर अवलंबून राहण्याची वेळही टळेल.

आता शेतकऱ्यांचे लक्ष शासनाच्या निर्णयाकडे लागले आहे. शासकीय धान खरेदी केंद्रे नेमकी कधी सुरू होणार आणि शेतकऱ्यांच्या मेहनतीला योग्य मोबदला कधी मिळणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

नवरात्र विशेष

## नवरात्रोत्सव विशेष : पाचवी कर्तृत्ववान स्त्री – महिला वाहनचालक

### स्त्रीच्या हातात स्टेअरिंग, आत्मविश्वासाच्या बळावर प्रगतीची वाट!



**दै. सिंहवाणी वृत्त, विशेष**

नवरात्रोत्सव म्हणजे स्त्रीशक्तीचा जागर. नऊ दिवस आपण देवीच्या विविध रूपांची पूजा करतो. मात्र, आपल्या आजूबाजूला अशा अनेक कर्तृत्ववान स्त्रिया आहेत, ज्या आपल्या मेहनतीने, जिद्दीने आणि आत्मविश्वासाने जीवनातील आव्हानांवर मात करतात. अशाच कर्तृत्ववान स्त्रियांपैकी एक म्हणजे महिला वाहनचालक! एकेकाळी वाहन चालवणे हे पुरुषांचे क्षेत्र मानले जात होते. महिलांनी घर सांभाळावे आणि पुरुषांनी बाहेरची जबाबदारी घ्यावी, अशी समाजाची धारणा होती. परंतु आजच्या आधुनिक युगात महिलांनी ही चौकट मोडून काढली आहे. दुचाकीपासून चारचाकीपर्यंत, रिक्षापासून एसटी बसपर्यंत आणि अवजड वाहनांपासून ते व्यावसायिक वाहतुकीपर्यंत महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.

महिला वाहनचालक केवळ वाहन चालवत नाही, तर ती स्वतःच्या स्वप्नांना गती देते. प्रवाशांना सुरक्षितपणे त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचवताना ती आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारीही समर्थपणे पार पाडते. सकाळपासून रात्रीपर्यंत रस्त्यावर असताना तिला वाहतुकीच्या कोंडीचा, बदलत्या हवामानाचा, प्रवाशांच्या विविध स्वभावांचा आणि अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तरीही ती संयमाने आणि धैर्याने आपले कर्तव्य पार पाडते.

एसटी बस चालवणारी महिला चालक असो, शहरात रिक्षा चालवणारी महिला असो किंवा खासगी वाहनातून प्रवाशांना सेवा देणारी महिला असो, प्रत्येक महिला चालक ही स्वावलंबनाचे प्रतीक आहे. तिच्या हातातील स्टेअरिंग हे केवळ वाहनाचे नियंत्रण नसून तिच्या आयुष्याला योग्य दिशा देणारे साधन आहे. महिला वाहनचालक बनण्यासाठी प्रशिक्षण, वाहतुकीच्या नियमांचे ज्ञान, प्रसंगावधान, संयम आणि आत्मविश्वास आवश्यक असतो. रस्त्यावर प्रवास करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या सुरक्षिततेची जबाबदारी वाहनचालकावर असते. त्यामुळे महिला चालक आपल्या कौशल्याने आणि शिस्तीने समाजापुढे एक आदर्श निर्माण करतात.

अनेक महिलांना आर्थिक परिस्थितीमुळे नोकरी करण्याची गरज असते, तर काही महिला स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे स्वप्न पाहतात. वाहनचालक म्हणून काम करण्याची संधी त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देते. स्वतःच्या कष्टाने कुटुंबाला हातभार लावणे, मुलांचे शिक्षण पूर्ण करणे आणि समाजात सन्मानाने जगणे, ही त्यांच्या जीवनातील मोठी उपलब्धी आहे. अशा महिलांकडे केवळ आश्चर्याने पाहण्यापेक्षा त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणे आवश्यक आहे. महिलांना सुरक्षित कामाचे वातावरण, योग्य प्रशिक्षण, रोजगाराच्या समान संधी आणि समाजाचा विश्वास मिळाला, तर त्या प्रत्येक क्षेत्रात नवनवीन शिखरे गाठू शकतात. या नवरात्रोत्सवात आपण देवीच्या शक्तीची आराधना करताना या कष्टकरी महिला वाहनचालकांचाही सन्मान करूया. कारण त्या आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करतात की स्त्री ही केवळ घराचा आधार नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीची वाहक आहे.

स्त्रीच्या हातात स्टेअरिंग आले की ती केवळ रस्ताच पार करत नाही, तर रूढींच्या सीमा ओलांडून स्वाभिमान, स्वावलंबन आणि समानतेच्या दिशेने वाटचाल करते.

**महिला वाहनचालकांना समर्पित चारोळी**

हाती स्टेअरिंग, मनात जिद्द, डोळ्यांत स्वप्नांची पहाट, कष्टांच्या बळावर चालते ती, यशाची धरुनी वाट; रूढींच्या बंधनांना तोडून, उंचावते स्त्रीशक्तीचा मान, कर्तृत्ववान महिला चालकांना, आमचा मानाचा सलाम!

**– सौ. माधुरी धनोकार,**
**अकोला**

# स्कंदमाता देवी : मातृत्वाचे वात्सल्य आणि संस्काराचा जागर

नवरात्र विशेष

**शशिकांत म. तोटे**
**दारव्हा, जि.यवतमाळ**

आज ललिता पंचमी. तद्वतच आदिशक्ती नवदुर्गेचे पाचवे रूप असलेल्या स्कंदमाता देवीच्या पूजनेतून मातृत्वाचे सामर्थ्य, संगोपन, सुसंस्कार आणि सुसंस्कृत समाज निर्मितीचे महत्त्व अधोरेखित होते. पौराणिक मान्यतेनुसार, भगवान शिव आणि पार्वती यांचे पुत्र कार्तिकेय हे देवसेनेचे सेनापती होते. त्यांची माता म्हणून पार्वतीला 'स्कंदमाता' हे नाव प्राप्त झाले. सिंहरुढ चतुर्भुज असलेल्या आणि मांडीवर स्कंदाला धारण केलेल्या देवीचे रूप मातृत्वातील प्रेम आणि मातृत्व यांचे मनोहरी दृश्य दर्शविते. स्कंदमाता देवीच्या एकाला हातात कमळ, दुसऱ्या हातात बालस्कंद आणि अन्य हातात आशीर्वाद व संरक्षणाची भावना असलेले हे रूप स्त्रीच्या कोमलते सोबतच तिच्यात सुप्त रूपाने स्थापित धैर्याची जाणीव करून देते. मातृत्व म्हणजे केवळ संगोपन नव्हे,तर उद्याच्या समाजाची जडणघडण होय. स्कंदमातेच्या रूपातून मिळणारा हा महत्त्वाचा सामाजिक संदेश आहे.

नवरात्रातील स्कंदमातेची आराधना म्हणजे केवळ धार्मिक सोपस्कार नव्हे, तर आपल्या वर्तनात माणुसकीचे संस्कार, जीवनात रुजविण्याची उत्तम संधी आहे. माता आपल्या मुलाला जसे प्रेमाने घडविते, तसेच समाजाने नव्या पिढीला सहिष्णुता आणि समतेचा मूल्यांनी समृद्ध केले पाहिजे. बालवयात घरात, व शालेय अभ्यासक्रमातून; समाजात जीवनात आणि समाज जीवनातील नैतिक मूल्यें राष्ट्राच्या प्रगतीस प्रस्थापित होत असतात.

एक आदर्श माता संपूर्ण कुळाचाच नव्हे,तर विश्वाचा उद्धार करते. स्कंदमातेचा संदेश हा आहे की,विवेकी मातृत्वाने सुसंस्कृत पिढी घडते आणि सुसंस्कृत पिढीतून समताधिष्ठित समाज निर्माण होतो. उत्तम मातृत्व आणि पालकत्वाचा संदेश पुराण काळापासून पुढे जात आहे. स्कंद मातेच्या चरणी नतमस्तक होताना स्त्रियांचा सन्मान, बालकांचे संरक्षण, समानतेचा स्वीकार आणि सुसंस्काराची जोपासना करण्याचा संकल्प केला,तर नवरात्रीचा उत्सव खऱ्या अथार्ने समाज परिवर्तनाचे पर्व ठरेल. आजचे बालक एक कुटुंबाचे नव्हे, तर राष्ट्राचे भविष्य असते. मुलांच्या मनात प्रेम निर्माण करून प्रामाणिकपणा, शौर्य, संयम, सामाजिक बांधिलकीची बीजे रुजविण्याच काम कुटुंबातून सुरू होते. त्यामुळे पालकांनी केवळ शैक्षणिक यश, व्यवसाय, नोकरी, मिळवण्याच्या अपेक्षा व्यतिरिक्त त्यांना संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनविणे ही तितकेच आवश्यक आहे.



आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांच्या हातात महागडी साधने आहेत.मात्र त्यांच्या बाल व भावविश्वाला समजून घेण्यासाठी पालकांकडे पुरेसा वेळ आहे का? हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. मोबाईल आणि डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे; मुलांशी संवाद, मैदानी खेळ, आणि कौटुंबिक सहवास कमी होत असल्याचे चित्र दिसते. पालकांनी मुलांसोबत वेळ घालववीणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि योग्य संस्कार रुजविण्याची प्रेरणा स्कंदमातेच्या रुपातून मिळते.

मुलांवर अपेक्षांच्या ओझे लादण्या ऐवजी त्यांच्या कौशल्यांना वाव देणे, चुका झाल्या समजून सांगणे आणि आत्मविश्वास वाढवणे हेच खऱ्या अर्थाने मातृत्वाची सामाजिक भूमिका आहे.

स्कंद मातेच्या पूजनातून स्त्रीच्या सन्मानाचा संदेश मिळतो. भारतीय संस्कृतीत मातेला पूजनीय स्थान दिले जाते. परंतु प्रत्यक्ष जीवनात समान संधी, सुरक्षितता आणि निर्णय स्वातंत्र्य मिळतेच असे नव्हे, स्त्रीं चा सन्मान व्हायला हवा. मुलांच्या संस्काराची जबाबदारी ही केवळ मातृत्वाचा भाग आहे असे नव्हे,तर वडील, आजी, आजोबा, मोठा भाऊ, बहीण आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्यांची आहे. घरकाम, बालसंगोपन आणि कुटुंबाची काळजी या जबाबदारीचे समान वाटप झाल्यास स्त्री पुरुष समानतेचा विचार सुद्धा प्रत्यक्षात उतरू लागेल.

स्कंदमातेचे रूप संरक्षण आणि ध्येय यांचीही आठवण करून देते. आज बालकांवरील अन्याय, अत्याचार, मुलींच्या शिक्षणातील अडथळे, शाळाबाह्य विद्यार्थी, बालमजुरी, बालविवाह, व्यसनाधीनता, शोषण, बाल गुन्हेगारी यासारख्या समस्या समाजासमोर आहेत. अशा समस्येविरुद्ध कायदे पुरेसे ठरत नसून समाजाची सामूहिक जबाबदारी महत्त्वाची भूमिका बजावते. प्रत्येक बालकांचे हक्क, सुरक्षित बालपण, आरोग्यपूर्ण जीवन, गुणवत्ता पूर्ण शिक्षण, आणि संधी देणे हा समाजाचा मूलभूत दृष्टिकोन असायला हवा. आज हाच संकल्प घेऊन नवरात्र उत्सव साजरा होणे अपेक्षित आहे. स्कंदमातेचा हा सामाजिक संदेश उत्सव साजरा करताना आचरणात आणला गेला,तर समाज परिवर्तनाचे पर्व ठरेल!

**मो.९१३०८३५४५८**

# दीक्षाभूमीवर अनुयायांसाठी १,१८९ स्वच्छतागृहे; सीसीटीव्हीचा पहारा

### आरोग्य सेवा, केंद्रीय नियंत्रण कक्ष आणि शुद्ध पाण्याची व्यवस्था, सुविधांची कामे वेळेत पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे येणाऱ्या लाखो अनुयायांना दर्शनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. अनुयायांची वाढती गर्दी लक्षात घेता स्वच्छता, आरोग्य सेवा, सुरक्षा, शुद्ध पाणी, निवास व्यवस्था आणि वाहतूक नियोजनावर विशेष भर देण्यात येत आहे. यंदा प्रथमच प्रशासनाच्या वतीने अनुयायांसाठी निवास व्यवस्था करण्यात आली असून, परिसरात एकूण १ हजार १८९ स्वच्छतागृहे उभारण्यात येत आहेत. यामध्ये सुमारे निम्मी स्वच्छतागृहे महिलांसाठी स्वतंत्रपणे उपलब्ध असतील. सर्व सुविधा निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

दीक्षाभूमी परिसरात अनुयायांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने व्यवस्थापन आणि समन्वयासाठी दक्षिण प्रवेशद्वाराजवळ केंद्रीय नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येत आहे. या कक्षातून निवास व्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षा, वैद्यकीय सेवा आणि वाहतूक व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यात येणार आहे. परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी मोठे एलईडी स्क्रीन उभारून विविध घडामोडींचे थेट प्रक्षेपण, आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन अनुयायांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.



**सीसीटीव्हीद्वारे संपूर्ण परिसरावर नजर**

दीक्षाभूमी परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत असून, ते केंद्रीय नियंत्रण कक्षाशी जोडले जाणार आहेत. त्यामुळे गर्दीवर लक्ष ठेवणे, संभाव्य अनुचित प्रकारांना प्रतिबंध करणे आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने कारवाई करणे शक्य होणार आहे. सुरक्षेसाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त, महिला सुरक्षा पथक आणि अग्निशमन दलही सज्ज ठेवण्यात येणार आहे.

**तीन ठिकाणी वैद्यकीय कक्ष**

अनुयायांना तातडीने आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी परिसरात तीन ठिकाणी वैद्यकीय कक्ष उभारण्यात येणार आहेत. दीक्षाभूमीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ, परिसराच्या आतील भागात आणि अण्णाभाऊ साठे चौकाजवळ हे कक्ष कार्यरत राहतील. येथे पुरेसे डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. आपत्कालीन परिस्थितीसाठी १०८ रुग्णवाहिका उपलब्ध राहणार असून, हृदयविकारासारख्या गंभीर प्रसंगी तातडीची सेवा देण्यासाठी कार्डियाक व्हॅनचीही व्यवस्था करण्यात येणार आहे. हे वैद्यकीय कक्ष केंद्रीय नियंत्रण कक्षाशी जोडले जाणार आहेत.

**स्वच्छता, पाणीपुरवठा आणि आरोग्याला प्राधान्य**

दीक्षाभूमी परिसर स्वच्छ आणि नीटनेटका राहावा, यासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. पुरेशा संख्येने मोबाईल स्वच्छतागृहे, नियमित साफसफाई, कचराकुंड्या, डासजन्य आजारांच्या नियंत्रणासाठी फवारणी आणि जंतुनाशकांची फवारणी करण्यात येणार आहे. स्वच्छता व्यवस्थेसाठी पुरेसे मनुष्यबळ नियुक्त करण्यासोबतच स्वच्छतेबाबत जनजागृती आणि देखरेख करण्यासाठी स्वयंसेवकांची मदत घेतली जाणार आहे. अनुयायांना शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात येत आहे.

**हरविलेल्या व्यक्तींसाठी स्वतंत्र कक्ष**

गर्दीच्या पार्श्वभूमीवर अनुयायांच्या सुरक्षेसाठी तक्रार निवारण कक्षासह हरविलेल्या व्यक्ती व बालकांचा शोध घेण्यासाठी आणि सापडलेल्या वस्तू जमा करण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहे. आपत्कालीन प्रसंगी मदत मिळविण्यासाठी १८००१२३००६१ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे.

दीक्षाभूमी येथे येणाऱ्या प्रत्येक अनुयायाला सुरक्षित वातावरणात दर्शन घेता यावे आणि कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे. तसेच नियोजित सर्व सुविधांची उभारणी तातडीने पूर्ण करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या आहेत.

# शेतातला ऊस शेतातच राहू द्या!

**कोल्हापूर :** ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पुकारलेले महामार्ग रोको आंदोलन आज सलग दुसऱ्या दिवशीही सुरूच आहे. पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर कोगनोळीपासून हावेरीपर्यंत हजारो शेतकरी रस्त्यावर ठाण मांडून बसले असून आंदोलनाची भूमिका स्पष्ट करताना राजू शेट्टी म्हणाले, काल सकाळी ११ वाजल्यापासून महामार्ग रोखून धरलेला आहे. प्रवाशांची गैरसोय होत आहे, त्याबद्दल मी त्यांची माफी मागतो. पण केंद्र सरकारसोबत ४ तास डोकेफोड करूनही काहीही साध्य झाले नाही. २४ तास उलटूनही निर्णय झालेला नाही. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही या न्यायाने दुर्दैवाने आम्हाला हा रस्ता रोखण्याचा निर्णय घ्यावा लागला.

रस्त्यावर अडकलेल्या वाहनचालकांबाबत संवेदनशीलता दाखवत शेट्टी यांनी स्थानिक शेतकऱ्यांना मोठे आवाहन केले. महामार्गावर बाहेरच्या राज्यातून आलेले अनेक ट्रक आणि कंटेनर ड्रायव्हर अडकले आहेत. त्यांची उपासमार होता कामा नये. त्यांच्या चहा-जेवणाची व्यवस्था करा. व्यवस्था होत नसेल तर संघटनेशी संपर्क साधा, आम्ही शिधा पुरवू. पण महाराष्ट्र आणि कर्नाटकचे आतिथ्य आपण दाखवून दिले पाहिजे असे ते म्हणाले.

शेट्टींनी केंद्र सरकारच्या धोरणावर जोरदार प्रहार केला. सरकारच्या तिजोरीवर एक रुपयाचाही बोजा पडणार नाही, एवढीच आमची मागणी आहे. ६० रुपयांनी विकल्या जाणाऱ्या साखरेची ५० रुपयांची हमी आम्हाला हवी आहे. तसेच, इथेनॉलमधून मिळणारा पैसा कारखान्यांमार्फत शेतकऱ्यांना द्यावा.

# नवीन हंगामातील खरेदीचा उत्साहात शुभारंभ; उमरेडमध्ये सोयाबीनला प्रतिक्विंटल ७,००१ रुपयांचा भाव शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित

### दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा, आवक ८६०० पोते

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

दुष्काळी परिस्थिती, पावसाचा लहरीपणा आणि शेती उत्पादनाबाबतची अनिश्चितता यामुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी उमरेड कृषी उत्पन्न बाजार समितीतून दिलासादायक बातमी समोर आली आहे. नवीन हंगामातील सोयाबीनच्या सर्वसाधारण व्यापारी खरेदीचा शुभारंभ उत्साहात झाला असून, पहिल्याच दिवशी सोयाबीनला प्रतिक्विंटल ७ हजार १ रुपये असा भाव मिळाला. या भावामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**सोयाबीनचे पूजन करून खरेदीचा शुभारंभ**

बाजार समितीच्या आवारात सोयाबीनच्या ढिगाचे विधिवत पूजन करून खरेदी प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. यावेळी बाजार समितीच्या वतीने उपस्थित शेतकऱ्यांचा टोपी व दुपट्टा देऊन सन्मान करण्यात आला. शेतकऱ्यांच्या कष्टाचा गौरव करत त्यांच्या हिताला प्राधान्य देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

**चांगल्या भावामुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या**

यंदाच्या हंगामात नैसर्गिक संकटे आणि वाढत्या शेतीखर्चामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत सोयाबीनला मिळालेला ७ हजार १ रुपयांचा भाव शेतकऱ्यांसाठी आशादायक ठरला आहे. मात्र, शेतीचा वाढलेला उत्पादन खर्च, मजुरी, खते, बियाणे आणि इतर खर्च लक्षात घेता शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनातून पुरेसा आर्थिक लाभ मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

पहिल्या दिवशी मिळालेला भाव कायम राहून आगामी काळातही शेतकऱ्यांच्या सोयाबीनला योग्य दर मिळावा, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. खुल्या लिलावातून शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळणे आणि खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, ही शेतकरी हिताच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे.

**शेतकऱ्यांना स्वच्छ व वाळवलेला माल आणण्याचे आवाहन**

बाजार समिती प्रशासनाने तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन व्यवस्थित वाळवून, स्वच्छ करून विक्रीसाठी बाजार समितीत आणावे, असे आवाहन केले आहे. शेतमालाची गुणवत्ता चांगली राहिल्यास योग्य भाव मिळण्यास मदत होऊ शकते.



**पदाधिकारी, संचालक व व्यापाऱ्यांची उपस्थिती**

खरेदी शुभारंभप्रसंगी बाजार समितीचे सभापती रुपचंद कडू, उपसभापती राजकुमार कोहपरे, सचिव प्रकाश महतकर, निरीक्षक अनिल कापसे यांच्यासह संचालक विजय खवास, मनोहर धोपटे, शिवदास कुकडकर, दत्तू फटिंग, नितीन बालपांडे, संदीप हुलके, राहुल नागेकर, महेश मरघडे, भोजराज दांदडे, ज्ञानेश्वर भोयर, यशोदा अबलंकर, संगीता ढेंगरे, रंगराव नेवारे, भिका भोयर, छोटू मोटघरे आणि सुभाष बारापत्रे उपस्थित होते.

व्यापारी वर्गातून सोनू भालोटिया, बंडू महाजन, आलोक जैन, महेंद्र अग्रवाल, शिवम अग्रवाल, चेतन नाकाडे, गिरीश लेंडे,रणधीर झाडे आणि पवन अग्रवाल यांच्यासह अडते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांना केवळ चांगल्या भावाची सुरुवात नव्हे, तर संपूर्ण हंगामात योग्य बाजारभाव मिळणे गरजेचे आहे. दुष्काळी परिस्थिती आणि वाढता उत्पादनखर्च लक्षात घेता बाजार समितीने शेतकरी हिताला प्राधान्य देत पारदर्शक लिलाव प्रक्रिया कायम ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.